कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १७ मार्च २०२६

किंमत ४ ₹

सी साईट रिसॉर्ट (नागांव)
कुक, वेटर व हाऊसकिपींग स्टाफ पाहिजे
संपर्क : ९४२२८५६३३६ ७३८५९६५८८५

## डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का

**नवी दिल्ली :** अमेरिका- इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध १७ व्या दिवशी सुरु आहे. इराणने युद्ध सुरु झाल्यानंतर होर्मुझची सामुद्रधुनीतील जहाजांची वाहतूक नियंत्रित करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे संतापलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया, यूके आणि फ्रान्सला युद्धनौका होर्मुझच्या सामुद्रधुनीत पाठवण्याचे आवाहन केले होते. मात्र, डोनाल्ड ट्रम्प यांच्या आवाहनाला जपान, दक्षिण कोरिया आणि ऑस्ट्रेलियाने ठेंगा दाखवला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रथ सोशल या प्लॅटफॉर्मवर पोस्ट करुन होर्मुझच्या सामुद्रधुनीत युद्धनौका पाठवण्याचे आवाहन केले होते.

## वे|ध|क

### आत्महत्येसाठी निघालेल्या तरुणाला वाचवले



**वावोशी-खोपोली :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आत्महत्या करण्याच्या उद्देशाने कारने निघालेल्या तरुणाचे प्राण पोलिसांच्या सतर्कतेमुळे थोडक्यात वाचले आहेत. इन्स्टाग्रामवर लाईव्ह व्हिडिओ करत आत्महत्येचा इशारा देत निघालेल्या या तरुणाला बोरघाट पोलिसांनी अमृतांजन पूल परिसरात कार अडवून ताब्यात घेतले. पोलिसांच्या वेगवान आणि तत्पर कारवाईमुळे संभाव्य अनर्थ टळल्याने या घटनेची परिसरात मोठी चर्चा सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खोपोली पोलीस ठाण्याच्या डायल ११२ वर •➤ पान २ वर


### ज्येष्ठांची ऑनलाइन फसवणूक

**पनवेल :** खारघर परिसरात ऑनलाइन फसवणुकीच्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना सुमारे ३९ लाखांचा गंडा घालण्यात आला. शेअर बाजारातील गुंतवणुकीचे आमिष तसेच सैन्यदलाचे नाव सांगून डिजिटल अटकेची भीती दाखवत ही फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. खारघर सेक्टर १८ येथील सिद्धी सोसायटीत राहणाऱ्या ७० वर्षीय सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिकाला सायबर भामट्यांनी २० लाख रुपयांचा गंडा घातला. तर, सेक्टर ३४ मधील बोंझर रेसिडेन्सी इमारतीत राहणाऱ्या ६८ वर्षीय महिलेची १९ लाखांची फसवणूक झाली. काही अनोळखी व्यक्तींनी सैन्यदलातील अधिकारी असल्याचे सांगून डिजिटल अरेस्टची भीती दाखवत लूट केली.

# प्रादेशिक योजनांच्या दुरुस्तीसाठी 2.74 कोटींचा निधी







- ८५ गावे व १५ वाड्यांमध्ये दुरुस्तीची कामे
- जिल्ह्यातील ८१० ग्रामपंचायतींचा समावेश

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील नागरिकांना पाणी मुबलक पुरवठा व्हावा, म्हणून प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना काही वर्षांपूर्वी राबविण्यात आल्या. परंतु, या योजनांमधील पाईप व संपवेल इत्यादी दुरुस्त करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे या प्रादेशिक योजनांना आता दुरुस्तीचा आधार देण्याचा प्रयत्न प्रशासनाने केला आहे. पाणीटंचाई कृती आराखड्यात यावर्षी नळ पाणीपुरवठा योजना विशेष दुरुस्तासाठी २ कोटी ७४ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ८५ गावे व १५ वाड्या अशा एकूण १०० ठिकाणी हा निधी खर्च केला जाणार असल्याची माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून उपलब्ध झाली आहे.

रायगड जिल्ह्यात ८१० ग्रामपंचायती असून, दोन हजारांहून अधिक गावे, वाड्यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारांहून अधिक आहे. जिल्ह्यातील अनेक गावे व वाड्यांना जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पुरवठा विभागामार्फत पाणीपुरवठा केला जातो. त्यासाठी जिल्ह्यामध्ये प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत.

अलिबाग तालुक्यातील उमटे, तिनविरा, कुसुंबळे, रेवस झोन एक व रेवस झोन दोन या पाच योजनांचा समावेश आहे. या योजनांद्वारे अलिबाग तालुक्यातील एक लाखहून अधिक नागरिकांना पाणी पुरवठा करण्याचा प्रयत्न केला जातो. जिल्ह्यातील लाखो नागरिकांना या योजनांद्वारे पाणीपुरवठा केला जातो. जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक पाण्याच्या योजना ४० हून अधिक वर्षांच्या आहेत. त्यामुळे या योजनांसाठी राबविण्यात आलेले पाईप खराब व जीर्ण झाले आहेत. अनेक वेळा पाईपला गळतीचा प्रश्न निर्माण होतो. पाईपच्या गळतीमुळे गावे, वाड्यांमध्ये मुबलक पाणीपुरवठा होत नाही. पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ येते. हा प्रश्न सोडविण्यासाठी यावर्षी पाणीटंचाई कृती आराखड्यात नळ पाणीपुरठा योजना विशेष दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. अनेक योजना होऊनही पाणी नाही, पाईप नादुरुस्त आहेत. हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी २ कोटी ७४ लाख ८४ हजार रुपयांचा अपेक्षित खर्च आहे. त्यामध्ये ८५ गावे व १५ वाड्या अशा एकूण १०० ठिकाणी हा निधी खर्च केला जाणार आहे. त्यामुळे अलिबाग तालुक्यातील उमटे, तिनविरासह अनेक प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीची कामे केली जाणार असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. पाईपची दुरुस्ती करण्यापासून वेगवेगळी कामे या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

### जुन्या विहिरी दुर्लक्षित

रायगड जिल्ह्यामध्ये मागील दीड वर्षांपासून जलजीवन योजना राबविण्यात आल्या. पाण्याचा स्त्रोत शोधून जलजीवन योजनेंतर्गत पाईप टाकण्यापासून हजारो लीटर क्षमता असलेल्या पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी विहिरी खोदण्यात आल्या आहेत. यावर्षी पाणीटंचाई कृती आराखड्यामध्ये सार्वजनिक विहिरी ब्रोल करण्याबरोबरच गाळ काढण्याचे काम केले जाणार आहे. जिल्ह्यातील १७४ ठिकाणी या विहिरींचे काम केले जाणार आहे. त्यासाठी १ कोटी ७२ लाख रुपयांच्या निधी खर्च होण्याची अपेक्षा आहे. मात्र, जलजीवन योजनांनंतर जिल्ह्यातील अनेक जुन्या सार्वजनिक विहिरी दुर्लक्षित असल्याचे चित्र आहे. काही विहिरींवर जाण्याच्या मार्गांवर अतिक्रमण झाले आहे. काही विहिरींची वेळवर दुरुस्ती झालेली नाही. त्यामुळे त्यांना गवत, झुडपांनी विळखा घातला आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

# विमानतळाकरिता केलेले भूसंपादन बेकायदा

## राज्य सरकार, सिडकोला न्यायालयाचा दणका



**। उरण । प्रतिनिधी ।**

सर्वोच न्यायालयाने सोमवारी (दि.१६) मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला मान्यता देऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळकरिता जमिनीचे केलेले संपादन बेकायदेशीर असून, कायद्याच्या तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे भूसंपादन रद्द करत महत्त्वाचा निर्णय दिला आहे.

पनवेल तालुक्यातील वहाळ येथील जमिनीच्या संपादनाविरुद्ध अविनाश नाईक व इतरांनी मुंबई उच्च न्यायालयात २०१७ साली याचिका दाखल केली होती. महाराष्ट्र शासनाने व सिडकोने २०१३च्या नवीन कायद्याच्या तरतुदीनुसार २० टक्के विकसित भूखंड न दिल्यामुळे ही याचिका दाखल केली होती. या शेतकऱ्यांनी २०१३च्या नवीन कायद्याच्या तरतुदीनुसार संपादित जमिनीचा चालू बाजारभावाप्रमाणे मोबदला व २० टक्के विकसित भूखंड मिळावे याकरिता महाराष्ट्र शासन व सिडकोकडे मागणी केली होती. या मागणीचा विचार न करता व त्यांची बाजू न ऐकता जमिनीचे संपादन केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने हे भूसंपादन रद्द करून या जमिनीवर वितरित केलेले भूखंड देखील रद्द केले. तसेच, शेतकरीच जमीन मालक आहेत, असे घोषित केले. या निकालामुळे आता शेतकऱ्यांना जमीन संपादनाकरिता जमिनीचा आर्थिक मोबदला तसेच २० टक्के विकसित भूखंड मिळणार आहेत. त्यामुळे सिडकोच्या २२.५ टक्के योजनेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या योजनेमध्ये फक्त १६.७५ टक्के भूखंड वितरित करण्यात येतो. त्यामुळे नवीन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे संपादित जमिनीचा चालू बाजार भावाप्रमाणे मोबदला व २० टक्के विकसित भूखंड निश्चितच शेतकऱ्यांकरिता फायदेशीर ठरणार आहे.

# आंबा पीक संकटात

## उत्पादनात ९० टक्के घट होण्याची भीती



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील अनेक भागांत आंब्याला मोहर चांगल्या पद्धतीने आला. मात्र, बदलत्या वातावरणाचा फटका आंबा पिकाला बसला असल्याची माहिती समोर येत आहे. आंबा मोहर करपला गेला आहे. यंदा आंब्याच्या उत्पादनात ९० टक्के घट होण्याची भीती आहे. त्यामुळे आंबा पीक संकटात सापडले असून, यावर्षी फक्त १० टक्के उत्पादन येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

कोकणात भातशेतीसह आंबा व काजू पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. या उत्पादनातून शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळते. त्यामुळे रायगडसह कोकणात ठिकठिकाणी काजू व आंबा पीक लागवड केली जाते. तरुणवर्गदेखील या लागवडीवर भर देत आहे. कोकणातील आंबा चविष्ट व खाण्यायोग्य असल्याने स्थानिकांसह पर्यटकांकडूनही आंब्याला मागणी प्रचंड आहे. वेगवेगळ्या राज्यातही कोकणातील आंब्याला मागणी आहे. आंबा उत्पादनातून कोट्यवधींची उलाढाल होते. कोकणात आंब्याचे क्षेत्र सुमारे पावणेतीन लाख आहे. त्यामध्ये रायगड •➤ पान २ वर

### विकासाच्या नावाखाली घरावरच बुलडोझर

**। उरण । प्रतिनिधी ।**

विकासाच्या नावाखाली कंपन्यांची मनमानी किती वाढली आहे, त्याचे धक्कादायक उदाहरण करंजा सातघर येथे समोर आले आहे. शेतकऱ्याच्या घराशेजारी परवानगीशिवाय पुलाचे काम सुरू केल्याचा गंभीर आरोप अफकॉन्स कंपनीवर करण्यात आला आहे. या प्रकारामुळे एका कुटुंबाच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची तक्रार करण्यात आली आहे.

करंजा सातघर येथील आशा कमळाकर थळी (घर क्र. २३४४, सर्वे नं. १६) यांच्या घराशेजारी अफकॉन्स कंपनीकडून पुलाचे काम सुरू करण्यात आले आहे. मात्र, घरमालकाची कोणतीही परवानगी न घेता काम सुरू केल्याने थळी कुटुंब धास्तावले आहे. या घरात एकूण नऊ जणांचे कुटुंब वास्तव्यास असून, पुलाच्या कामामुळे घराला तसेच कुटुंबाच्या •➤ पान २ वर

### रिकाम्या प्लॉटमध्ये लागली आग

**पनवेल :** शहरातील बावन्न बंगला विभागातील सुशील गार्डनच्या मागील बाजूस असलेल्या रिकाम्या प्लॉटमध्ये अचानक आग लागल्याची घटना घडली. रात्रीच्या सुमारास लागलेल्या या आगीमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. मिळालेल्या माहितीनुसार, सुशील गार्डनच्या मागील बाजूस असलेल्या मोकळ्या प्लॉटमध्ये अचानक आग लागली. परिसरातील नागरिकांनी धूर आणि ज्वाळा दिसताच तात्काळ अग्निशमन विभागाला माहिती दिली. •➤ पान २ वर

## नेरळमध्ये नळजोडण्या घोटाळा, घेतलेला लाखोंचा निधी गायब



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ग्रामपंचायतीकडून प्रशासक काळात २५ नळजोडण्या एका बांधकाम व्यावसायिकाला देण्यात आल्या आहेत. त्या नळजोडण्यांसाठी रीतसर देणगी नेरळ ग्रामपंचायतीकडे जमा झालेली नाही. तसेच, त्या नळजोडण्यांसाठी प्रशासक तसेच ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडून पाणीपुरवठा विभागाला पत्र देण्यात आलेले नाही. त्यामुळे कर्जत पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे यांनी हा घोटाळा बाहेर काढला असून, सर्व नळजोडण्या काढून टाकण्याचे आदेश दिले आहेत. या नळजोडण्यांप्रकरणी प्रशासक आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्यावर तात्काळ कारवाई होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, कोणतीही कारवाई नेरळ ग्रामपंचायतीकडून करण्यात आलेली नाही.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील पाण्याची व्यावसायिक नळजोडणीसाठी प्रतिजोडणी २ ते अडीच लाख रुपये घेतले जातात. ग्रामपंचायतमधील •➤ पान २ वर

### टेम्पोच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यातील तेलवडे ग्रामपंचायत हद्दीतील रस्तावरून जाणारे पादचारी संतोष पानवलकर (५६) यांचा टेम्पोच्या धडकेत मृत्यु झाल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सव्वादोनच्या सुमारास एक आयशर टेम्पो तेलवडे गावातील चौधरी फर्निचर दुकानासमोरील रस्त्यावर चालक राम कुमार शाम बिन्द याने क्लिनर खाली न ठेवता टेम्पो मागे घेतला. त्याचवेळी त्या टेम्पेच्या मागुन चालत जाणारे पादचारी संतोष सुंदर पानवलकर (५६) यांना धडक बसली आणि ते रस्त्यावर पडले. त्यावेळी त्या टेम्पोचे मागचे चाक त्यांच्या खांद्यावरून गेले आणि ते गंभीर जखमी झाले. •➤ पान २ वर

# ‘एमएसआयडीसी’च्या बेफिकिरीचा फटका

- बेलकडे ग्रामस्थ ३० दिवसांपासून पाण्यावाचून त्रस्त
- पाईपलाईन फुटूनही दुरुस्तीला विलंब; ग्रामस्थांचा रास्ता रोकोचा इशारा



**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील बेलकडे गावाच्या हद्दीत सुरू असलेल्या रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा फटका थेट ग्रामस्थांना बसत आहे. खोदकामादरम्यान पिण्याच्या पाण्याची मुख्य पाईपलाईन फुटूनही ती तातडीने दुरुस्त करण्यात आलेली नसल्याने जवळपास महिनाभरापासून बेलकडे ग्रामस्थ पाण्यावाचून त्रस्त झाले आहेत. एमएसआयडीसीमार्फत •➤ पान २ वर

### अजून किती दिवस पाण्यावाचून?

गेल्या अनेक दिवसांपासून गावात पाण्याचा थेंबही उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांची अवस्था बिकट झाली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी दररोज धावपळ करावी लागत असून, दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेल्या या परिस्थितीवर संतप्त ग्रामस्थांनी ‘‘अजून किती दिवस वाट पाहायची?’’ असा सवाल उपस्थित केला आहे. तातडीने पाईपलाईन दुरुस्त न झाल्यास रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा देत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्याची तयारी ग्रामस्थांनी दर्शवली आहे.

### आदेश दिले, काम कुठेय?

याप्रकरणी एमएसआयडीसीचे अभियंता बी.के. सिंग यांच्याशी दोन दिवसांपूर्वी संपर्क साधला असता त्यांनी ठेकेदाराला तातडीने दुरुस्तीचे आदेश देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, या घटनेला चार दिवस उलटूनही प्रत्यक्षात कोणतीही हालचाल झालेली नाही. अधिकारी आदेश देतात आणि ठेकेदार त्याकडे दुर्लक्ष करतो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदारावर कारवाई करून त्याचा ठेका रद्द करावा, अशी तीव्र मागणी बेलकडे ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# कोळसा, ईलेक्ट्रिक शेगड्यांना मागणी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गॅस तुटवड्यामुळे लाकूड, कोळसा आणि ईलेक्ट्रिक शेगड्यांची मागणी वाढली आहे. पनवेल शहरात ढाबाचालकांनी लाकडाच्या चुलीचा आधार घेत काही दिवसांपासून चुलीवर जेवण तसेच इतर खाद्यपदार्थ बनवण्यास सुरुवात केली आहे. शहरांमध्ये गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे हॉटेल आणि घरगुती स्वयंपाकासाठी पर्यायी इंधनाचा वापर वाढला आहे.



गॅसपुरवठा बंद झाल्याने काही व्यवसाय सध्या बंद आहेत. पनवेल तालुक्यात ५० पेक्षा जास्त लहान-मोठे ढाबे असून त्यांच्यावर गॅस तुटवड्यामुळे संकट ओढवले आहे. वीकेण्डला खास आगरी पद्धतीच्या जेवणाच्या बेतासाठी अनेकजण ढाबे गाठतात. मात्र, गॅस सिलिंडरच उपलब्ध होत नसल्याने अनेक व्यवसाय बंद पडण्याच्या स्थितीत आहेत. यावर उपाय म्हणून हॉटेलमालकांनी चुलीवरच्या जेवणाचा पर्याय स्वीकारला आहे. लाकूड आणि कोळशाच्या दरातही २० ते ३० टक्के वाढ झाली आहे. ईलेक्ट्रिक शेगड्यांची मागणी अचानक वाढली असून दुकाने आणि ऑनलाइन विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे.

### लाकडाच्या किमतीत वाढ

मागणी वाढल्याने लाकडांच्या दरातही वाढ झाली आहे. पूर्वी ४ ते ५ रुपये किलो दराने मिळणारे लाकूड आता ८ ते १२ रुपये किलो दराने विकले जात आहे. उद्भवलेल्या संकटामुळे खवय्यांना मात्र अस्सल चुलीवरची चव चाखायला मिळत आहे. मात्र, गॅसटंचाईअभावी हॉटेल व्यावसायिकांची आर्थिक गणित बिघडले आहे. गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याने व्यवसाय बंद न ठेवता लाकडांच्या आधारे चूल पेटवण्याचा निर्णय आम्ही घेतला. त्यामुळे जेवणाची चव वाढतेच, ग्राहकदेखील समाधानी होत आहेत. गॅसच्या तुलनेत यासाठी मेहनत जास्त असली तरी ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी चार दिवसांपासून आम्ही ग्राहकांना चुलीवरचे जेवण देत आहोत, असे ढाबाचालक संजय पोपेटा यांनी सांगितले.

## यूपीएसपी परिक्षेत घवघवीत यश | रायगडसह रोहाच्या शिरपेचात मानाचा तुरा

# संकेत कुंभारची गगनभरारी



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।**

आपल्या जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर संकेत कुंभार या तरुणाने स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. यूपीएससी अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत त्याने गगनभरारी घेतली. त्याच्या यशाबद्दल रायगडसह रोहाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. भारतीय राजस्व सेवा अधिकारी म्हणून त्याची निवड झाली आहे.

संकेत कुंभारचे प्राथमिक शिक्षण रोहा येथील कोकण एज्युकेशन सोसायटी, मधुकर सीताराम गांगल प्रायमरी स्कूलमध्ये झाले. त्याचे माध्यमिक शिक्षण रोहा येथील मेहंदळे स्कूलमध्ये झाले. त्यानंतर सातारा जिल्ह्यातील कराड येथील सद्गुरु गाडगे बाबा, महाराष्ट्र कॉलेज येथे झाले. माणगावमधील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठामध्ये मॅकेनिकल इंजिनिअरचे शिक्षण घेतले. संकेत कुंभार यांनी प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. हे स्वप्न त्यांनी त्यांच्या मेहनतीमधून प्रत्यक्षात उतरवून दाखविले. यूपीएससी अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत त्यांनी देदीप्यमान यश संपादन करून आपल्य स्वप्नाला प्रत्यक्षात उतरवून दाखविले. संकेत यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात आले. संकेत कुंभार यांचे वडील रोहा तालुक्यातील कोकबन येथील न्यू इंग्लिश हायस्कूलध्ये शिक्षक आहेत. त्यांची आई गृहिणी आहे. आई, वडिलांकडून मिळालेल्या प्रोत्साहनामुळे आणि शिक्षकांकडून मिळालेले मार्गदर्शनातून स्पर्धा परीक्षेत संकेत यांनी घवघवती यश मिळवले.

माणगाव तालुक्यातील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठामध्ये मॅकेनिकल इंजिनिअरचे शिक्षण घेत असताना तृतीय वर्षामध्ये संकेत कुंभार यांनी एक प्रोजेक्ट तयार केला होता. जिल्ह्यात दुचाकी संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी तसेच हेल्मेटचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी त्यावेळी दुचाकीस्वारांसाठी फुल फेस फोल्डेबल तसेच एडजेस्टेबल हेल्मेट बनविले होते. ‘ऑनलाईन अन्वेषण’ या राष्ट्रीय संशोधन स्पर्धेत बेसिक सायन्स विभागातून इंदुर येथे देशपातळीवरील स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला होता. महाविद्यालय जीवनात संकेत कुंभार यांच्या संशोधक वृत्तीला चालना मिळाली. आपल्या अभ्यास व संशोधक वृत्तीने स्पर्धा परीक्षेत यश संपादन करून रायगडसह रोहा तालुक्याचे नावलौकिक केले.

पान १ वरून

## आत्महत्येसाठी निघालेल्या तरुणाला वाचवले

शनिवारी (दि.१५) पहाटे सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास एक तातडीचा कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने आपल्या मित्राने क्रेटा कार घेऊन इन्स्टाग्रामवर लाईव्ह व्हिडिओ करत आत्महत्या करण्यासाठी निघाल्याची माहिती दिली. ही धक्कादायक माहिती मिळताच खोपोली पोलिसांनी तात्काळ बोरघाट पोलीस पथकाला सतर्क केले. त्यानंतर बोरघाट येथील डी.डी. पथकातील पोलीस शिपाई सचिन घोरपडे यांनी त्वरित ही माहिती बोरघाट व्हॉट्सअॅप ग्रुपवर प्रसारित केली. प्रभारी अधिकारी स्वप्निल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित तरुण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून जाण्याची शक्यता लक्षात घेऊन महामार्गावर शोधमोहीम सुरू करण्यात आली. बोरघाट पोलीस मदत केंद्रातील पोलिसांनी जवळपास दीड तास महामार्गावर सतर्कपणे लक्ष ठेवून शोध सुरू ठेवला. अखेर अमृतांजन पूल परिसरात संबंधित क्रेटा कार दिसताच पोलिसांनी तात्काळ ती अडवली. वाहन चालकाची चौकशी केली असता त्याने आपले नाव संजय सुदाम दंडवते (२३, रा. वाघोली, ता. हवेली, जि. पुणे) असे सांगितले.

डायल ११२ वरून मिळालेल्या माहितीनुसार, तोच तरुण असल्याची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी त्याच्याशी आपुलकीने संवाद साधत त्याला शांत केले आणि आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त केले. प्रभारी अधिकारी स्वप्निल पाटील यांच्या आदेशानुसार बोरघाट पोलीस मदत केंद्राच्या शासकीय वाहनातून त्या तरुणाला खोपोली पोलीस ठाण्यात आणून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

## घेतलेला निधी गायब

कारभार सांभाळण्यासाठी हा निधी देणगी म्हणून स्वीकारला जातो आणि त्या निधीची रीतसर पावतीदेखील दिली जाते. मात्र, मागील सदस्य मंडळात व्यावसायिक नळजोडण्या देताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि त्यावेळी काही हजारांवर व्यावसायिक जोडण्या देण्यात आल्या होत्या. मात्र, देणगी पावती ही ठराविक रकमेची न बनवता बिल्डर लॉबीवर मेहरनजर ठेवली जात होती. त्यानंतर प्रशासक काळात तर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे पगार देण्याऐवढी आर्थिक आवक राहिली नाही, असा बोभाटा प्रशासक आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडून केला गेला. दुसरीकडे नळजोडण्या देण्याचे कार्य प्रशासन करीत होते आणि नळजोडण्या दिल्यानंतर जमा करावयाच्या देगण्या या ग्रामपंचायतीकडे जमा झालेल्या नाहीत. त्यामुळे स्थानिक पातळीवर किरकोळ कामे करण्यासाठी आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे पगार करण्यासाठी पगार करण्यासाठी निधी जमा झालेला नाही. प्रशासक पदाच्या काळात हा सर्व प्रकार अधिक वाढला आणि नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीनंतर प्रशासक राजवटीत झालेले गैरव्यवहार समोर येऊ लागले आहेत.

या सर्व नळजोडण्या दिल्याबद्दल २ लाख प्रति एक नळजोडणी याप्रमाणे महसूल देणगी स्वरूपात जमा करण्यात यावे किंवा नळजोडणी अवैध प्रकारे जोडली गेली असल्यास संबंधित बिल्डरवर गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच, नळजोडणी करून पाणी पुरवठा उचलण्यात येत असल्याबद्दल ग्रामपंचायत अधिकारी आणि प्रशासक यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कर्जत पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे यांनी केली आहे. परंतु, या घटनेला आठ दिवसांचा कालावधी लोटला असून, नळजोडण्या बेकायदेशीर टाकण्याची परवानगी देणाऱ्या प्रशासक आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे नेरळ गावातील ग्रामस्थ नेरळ ग्रामपंचायतीच्या कारभारावर संतप्त झाले आहेत.

## टेम्पोच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

याबाबतची माहिती मिळताच मुरूडचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दिनेश गायकवाड व वाहतुक पोलीस नाईक किशोर बठारे हे घटनास्थळी पोचले. तसेच, ग्रामस्थ व नातेवाईकांच्या सहाय्याने संतोष पानवलकर यांना तात्काळ मुरूड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी संतोष पानवलकर यांना मृत घोषीत केले. त्यामुळे चालकाविरोधात मुरूड पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास मुरुड पोलीस करित आहेत.

## रिकाम्या प्लॉटमध्ये लागली आग

माहिती मिळताच पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि शर्थीचे प्रयत्न करून काही वेळातच आग आटोक्यात आणली. ही आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. संबंधित विभागाकडून या घटनेचा पुढील तपास करण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. दरम्यान, आग लागल्यामुळे काही काळ परिसरात धुराचे लोट पसरले होते. अग्निशमन दलाने तत्परतेने कारवाई केल्यामुळे आग जवळील घरांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच नियंत्रणात आली आणि मोठा अनर्थ टळला.

## विकासाच्या नावाखाली घरावरच बुलडोझर

जीवितास धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. यासंदर्भात ११ मार्च रोजी आशा थळी यांनी उरण तहसील कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, पुलाच्या कामामुळे त्यांच्या कुटुंबाच्या जीवितास काही धोका झाल्यास अफकॉन्स कंपनी, संबंधित अधिकारी, वन विभाग तसेच ग्रामपंचायत जबाबदार राहतील.

दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत उरण तहसील कार्यालयाने मंडळ अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले आहेत. अधिकार अभिलेखांची तपासणी करून, प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून तसेच शासनाचे कायदे, नियम व प्रचलित धोरणांच्या आधारे सखोल चौकशी करून वस्तुस्थितीचा अहवाल सादर करावा, असे निवासी नायब तहसीलदार महेश पाटील यांनी लेखी निर्देश दिले आहेत. दरम्यान, या प्रकारामुळे परिसरात संतापाचे वातावरण असून, विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या घरावरच बुलडोझर चालवण्याचा उद्योग थांबवावा, अशी जोरदार मागणी उरण तालुक्यातून होत आहे.

## आंबा पीक संकटात

जिल्ह्यात आंब्याचे क्षेत्र १७ हजार हेक्टरहुन अधिक आहे. आंबा उत्पादन वाढीसाठी कृषी विभागाकडून वेगवेगळे प्रयत्न करण्यात आले. जिल्ह्यातील अनेक शेतकरी भातशेतीसह आंब्याची लागवड करण्यावर अधिक भर देत आहेत. यावर्षी पाऊस लांबणीवर गेला असला, तरी आंब्याला मोहर चांगला आला. परंतु, नोव्हेंबरमध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे मोहर गळून पडले. शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या सल्ल्यानुसार, फवारणी केली. मात्र, त्याचा काहीच फायदा झाला नसल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. त्यानंतर बदलत्या वातावरणामुळे आंब्याचे मोहर करपले असून, त्याचा परिणाम आंब्याच्या उत्पादनावर झाला. आंबा यंदा चांगला येईल, अशी अपेक्षी शेतकऱ्यांना होती. परंतु, आंब्याच्या उत्पादनात प्रचंड घट होण्याची शक्यता आहे. आंब्याच्या उत्पादनात यावर्षी ९० टक्के घट होण्याची शक्यता आहे. फक्त हातामध्ये दहा टक्केच आंबा शेतकऱ्यांना मिळणार आहे.

**हेक्टरी पाच लाख भरपाई द्या!**

पर्यावरणाच्या बदलाचा धोका निर्माण झाला आहे.आंबा पीक संकटात सापडले आहे. यावर्षी दहा टक्के उत्पादन येण्याची शक्यता असल्याचा अहवालही शासनाकडे पाठविण्यात आला आहे. नुकसानीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी शासनाने हेक्टरी पाच लाख रुपये भरपाई देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी केली आहे.

## 'एमएसआयडीसी'च्या बेफिकिरीचा फटका

सुरू असलेल्या या कामात ठेकेदाराकडून पाईपलाईन दुरुस्तीची केवळ टोलवाटोलवी होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

अलिबाग-रोहा तसेच अलिबाग-मुरुड या मार्गांच्या रुंदीकरणासह गटारांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम मागील पाच ते सहा महिन्यांपासून सुरू आहे. या कामासाठी अनेक ठिकाणी रस्ते खोदून ठेवण्यात आले असून, त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन हालचालींनाही अडथळे निर्माण होत आहेत. तरीही विकासकामांना विरोध न करता नागरिक संयम बाळगत होते. मात्र, विकासाच्या नावाखाली मूलभूत सुविधांवरच गदा येत असल्याचा आरोप आता ग्रामस्थांकडून केला जात आहे.

बेलकडे गावाच्या हद्दीत गटारासाठी करण्यात आलेल्या खोदकामादरम्यान सुमारे ३० दिवसांपूर्वी पाण्याची मुख्य पाईपलाईन फुटली. त्यामुळे परिसरातील सुमारे तीस ते चाळीस कुटुंबांचा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद पडला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना दररोज वणवण भटकावे लागत असून, घरातील दैनंदिन कामेही ठप्प झाली आहेत. विशेषतः वृद्ध नागरिकांना पाण्यासाठी बाहेर भटकंती करणे कठीण होत असल्याने त्यांचे हाल अधिकच वाढले आहेत.

ग्रामस्थांनी वारंवार संबंधित ठेकेदाराकडे तक्रारी केल्या असतानाही दुरुस्तीचे काम होत नसल्याने नाराजी वाढत आहे. ''आज करतो, उद्या करतो'' अशी उत्तरे देत वेळ मारून नेण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान, पाण्याचा प्रश्न तातडीने सोडवण्यात आला नाही तर ग्रामस्थ रस्त्यावर उतरून तीव्र रास्ता रोको आंदोलन छेडतील, असा इशारा बेलकडे ग्रामस्थांनी दिला आहे.


**जाहीर नोटीस**

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

ज. नों. प्रस्ताव क्र. १३२/२०२६

१. शौकत उस्मान राउत,
रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

३. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
निजामपूर, ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगाव, जि. रायगड

४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव
जि. रायगड — सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी शौकत उस्मान राउत, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०३/०२/१९६८ रोजी मौजे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

शौकत उस्मान राउत, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०३/०२/१९६८ रोजी मौजे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म-मृत्यू- विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत निजामपूर, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच शौकत उस्मान राउत, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत गोरेगाव यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास शौकत उस्मान राउत, रा. निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०३/०२/१९६८ रोजी मौजे निजामपूर, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण: माणगाव
दिनांक : १३/०३/२०२६

सही
**(विपीन लोकरे)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसिलदार माणगाव



**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | M/s. Moralwar Multitrade Pvt. Ltd, Plot No. १०९ Sector १०, Kharghar ४१०२१० | ०२ बोर, ०२ रेन ट्री, ०२ बदाम ०२ चारकोल ट्री व ०१ सोनमोहर अशी एकूण ०९ झाडे तोडणे. | भुखंड क्र. १०९, सेक्टर १०, खारघर, ता पनवेल, जि. रायगड या भूखंडाच्या आवारातील ०९ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| २ | मे. पूजा प्रॉपर्टीज तर्फे भागीदार गणेश संभाजी भगत, फायनल प्लॉट नं. १०४, धवलगिरी सोसायटी, पीस पार्क हॉटेलच्या बाजूला, पनवेल | ०१ जांभूळ, ०१ आंबा व ०१ फणस अशी एकूण ०३ झाडे तोडणे. | फायनल प्लॉट नं. १०४, धवलगिरी सोसायटी, पीस पार्क हॉटेलच्या बाजूला पनवेल या भूखंडाच्या आवारातील ०१ जांभूळ झाड सुकलेले धोकादायक असून ०१, आंबा व ०१ फणस ही झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस/भूखंडामध्ये प्रवेश करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.- PMC-PARK/97/2026-PTAD



**जाहिर नोटीस**

माझे अशिल श्री. रोहन अजित ताम्हाणे आणि श्री. अजित ताम्हाणे, रा. १३०१/१३०२, १३ वा मजला, शिवशक्ती हाईटसब, पटेल चौक, घाटकोपर-पूर्व, मुंबई-४०० ०७७, यांच्यावतीने सर्व संबंधितांस सूचना/ इशारा देण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या मिळकतीबाबत माझ्या अशिलांचा आणि (१) अनिता कैलाश गांधी, (२) अलका अनिल पाटील, (३) संगिता पुरुषोत्तम शहा, (४) हेमांगी हेमंत साखळे, (५) सरिता संतोष ओसवाल आणि (६) संतोष पुरुषोत्तम शहा यांचा वाद आहे. सदर वादाबद्दल माझ्या अशिलांनी दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, अलिबाग येथे वरील अनिता कैलाश गांधी इतर यांच्याविरुध्द स्पेसिफिक परफोमन्स्चा दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याचा ईफायलिंग क्रं. AMH20240000411C202600002 व स्पेशल सिव्हिल सुट क्र. १७/२०२६ आहे, त्याबाबतची लिस पेंडन्स नोटीस ही दिनांक ०४.०३.२०२६ रोजी अलिबाग येथील नोंदणीकृत कार्यालयात नोंदणी केलेली आहे त्याचा क्रं अलज - १६३६-२०२६, दिनांक ०४.०३.२०२६ आहे.

सदर दाव्यात मा. न्यायालयाने दिनांक १०.०३.२०२६ रोजी status-quo चा आदेश दिला आहे, जो पुढील तारखेपर्यंत म्हणजे दिनांक २७.०३.२०२६ रोजी पर्यंत कार्यान्वित राहिल, जेव्हा मा. न्यायालय निशाणी क्रं.५ वर सुनावणी घेतील.

तसेच, जर कोणी खाली नमूद केलेल्या मिळकतीत व वर नमूद केलेल्या व्यक्ती अनिता कैलाश गांधी व इतर यांच्याशी कुठलाही गैर व्यवहार केला तर सदरचा व्यवहार हा माझ्या अशिलांच्या हक्काच्या व स्पेशल सिव्हिल सुट क्रं.१७/२०२६ च्या सापेक्ष राहिल तसेच, मा. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर, अलिबाग यांच्या दिनांक १०.०३.२०२६ रोजीच्या आदेशाचा अवमान असेल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**पहिले परिशिष्ट**

मिळकती ज्यात पुरूषोत्तम हिराचंद शाह यांचे १/३ अविभाजीत शेअर, हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध आहेत.

| अ. क्र. | येथे स्थित | सर्वे क्र. | हिस्सा क्र. | गट क्र. | क्षेत्र एच.आर. पी. | मूल्यांकन रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मांडवे-झिराड | २ | १ सी ३ | - | ०-२३-३ | ७.०२ |
| | | | | | ०-०३-३ | |
| २. | - | ९ | १ए१बी२ | - | ०-१२-९ | ३.६८ |
| | | | | | ०-०२-६ | |
| ३. | - | ९ | १ए१ए४ | - | ०-२३-७ | ७.११ |
| | | | | | ०-०५-१ | |
| ४. | - | ९ | १ए१ए३ | - | १-०९-९ | २.८९ |
| | | | | | ०-०१-८ | |
| ५. | - | ५ | २ | - | २-२६-९ | २.९९ |
| | | | | | ०-६८-१ | |
| ६. | - | ४ ए | १ | - | ०-२२-० | ०.४७ |
| | | | | | ०-०६-० | |
| ७. | धोकवडे | - | - | ३५१ | ०-२३-९ | ४. १४ |
| | | | | | ०-०१-० | |

**दुसरे परिशिष्ट**

मिळकती ज्यात पुरूषोत्तम हिराचंद शाह यांचे १/४ अविभाजीत शेअर, हक्क,नामाधिकार आणि हितसंबंध आहेत.

| अ. क्र. | येथे स्थित | सर्वे क्र. | हिस्सा क्र. | गट क्र. | क्षेत्र एच.आर. पी. | मूल्यांकन रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | धोकवडे | - | - | २१४ ए | २-७०-४८ | ३.६६ |
| | | | | २१४/१/ए/१ | | |
| २. | धोकवडे | - | - | २६२ | ३-०६-० | ५.६२ |
| | | | | | ०-०८-० | |
| ३. | धोकवडे | - | - | २१४ बी | ०-०३-१८ | ४.८० |
| | | | | २१४/२ | | |

**तिसरे परिशिष्ट**

मिळकती ज्यात पुरूषोत्तम हिराचंद शाह यांचे अविभाजीत शेअर, हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध आहेत.

| अ. क्र. | येथे स्थित | सर्वे क्र. | हिस्सा क्र. | गट क्र. | क्षेत्र एच.आर. पी. | मूल्यांकन रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धोकवडे | - | - | ४९१ | ०-६२-० | १.१२ |

आज दिनांक १६, माहे मार्च, २०२६.

सही/-
**(संदीप सुर्यवंशी)**
**सी-४, श्री वक्रंतुड कॉ.ऑप.हौ.सोसा.,**
**प्लॉट क्रं.५६५, सेक्टर क्रं.५, चारकोप**
**कांदिवली-पश्चिम, मुंबई -४०००६७**



**जाहीर नोटीस**

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे उक्रुळ, ता. कर्जत येथील सर्वे नं. ९, हिस्सा नं. ५, क्षेत्र ००-०४-०० ही जमीन मिळकत त्यांचे मालक श्री. गजानन नारायण थोरवे वगैरे ४ यांचेकडून आम्ही खरेदी करण्याचे ठरवले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचे दान, बक्षीस, खरेदी, साठेकरार व बयाना पावतीद्वारे व्यवहार केलेला असेल तर खालील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसात खालील पत्त्यावर हरकत अथवा संपर्क करावा.

संपर्क
**जितेंद्र बाळू खडे**
मो. नं. ८०८७४३४०३२
मु. उक्रुळ पोस्ट-चिंचवली
कर्जत ता.कर्जत जि. रायगड



**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा
**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, प्रादेशिक विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव** – केआरसीएलच्या रत्नागिरी विभागांतर्गत माणगाव सेक्शनमध्ये एनएचएआय मार्फत प्रस्तावित आरओबी क्र. – 1 (22 कि.मी.) व आरओबी क्र. – 3 (29 कि.मी.) साठी ओएचईचे विद्युत सुधारणा काम करणे. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/22/2025 दिनांक 17/03/2026, अंदाजित खर्च** – ₹ 1,83,99,412/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 2,42,000/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 01/04/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.



ग्रुप ग्रामपंचायत देवळी
ता. माणगाव, जि. रायगड
निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत देवळी मध्ये ग्रामनिधी व १५ वित्त आयोग योजने अंतर्गत खालील काम करण्यासाठी ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर करणेची अंतिम तारीख | १ टक्का इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालय दुरूस्त करणे | १०००००/- | ३१/३/२०२६ | २०/३/२०२६ | १०००/- | २००/- |
| २ | देवळी शाळा मुलींचे स्वच्छता गृह दुरूस्त करणे | १०००५६/- | १५/४/२०२६ | २०/३/२०२६ | १०००/- | २००/- |
| ३ | देवळी अंगणवाडी संरक्षण भिंत बांधणे | ६१३१५/- | १५/४/२०२६ | २०/३/२०२६ | ६१३/- | २००/- |
| ४ | देवळी बौद्धवाडी येथे गटार बांधणे | ७२८१७/- | १५/४/२०२६ | २०/३/२०२६ | ७२८/- | २००/- |
| ५ | मूर बौद्धवाडी येथे गटार बांधणे | ६१३१४/- | १५/४/२०२६ | २०/३/२०२६ | ६१३/- | २००/- |

अटी व शर्ती
१) प्राप्त निविदा दि. २३/३/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय देवळी येथे उपस्थितांच्या समक्ष मा. प्रशासक यांच्या हस्ते उघडण्यात येईल.
२) ठेकेदार नोंदणीकृत असावा.
३) कोणतीही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. प्रशासक देवळी यांना राखून ठेवला आहे.
४) प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील.
५) मा. उपभियांता साो बांधकाम/पाणीपुरवठा उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्रा. पं चे पदाधिकारी सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली सदर काम देखरेखीखाली करण्याचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेला आहे.
६) काम अंतिमरीत्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून सुरक्षा अनामत परत केली जाईल.

सही/-
ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत देवळी

सही/-
प्रशासक
ग्रुप ग्रामपंचायत देवळी



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification.

| | |
|---|---|
| **Tender No. : E-Tender -02/2026-27**<br>**Name of Tender :** E-Tender for providing three nos. of skilled labours & two nos. of unskilled labours against vacant post of LDC (F&A), UDC (F&A), Store Helper & Peon at Major Stores, Panvel for FY 2026-27.<br>**Tender Fee :- Rs. 500/- + applicable GST**<br>**RFx No. - 7000039323** | **Online Downloading the RFx :** Dt. 17.03.2026, 00:00 Hrs. to 31.03.2026, 23:59 Hrs.<br>**Online Submission of the RFx :** On or Before Dt. 31.03.2026, 23:59 Hrs.<br>**Online Opening of the Techno Commercial RFx :** Dt. 01.04.2026 at 10:00 Hrs. (If possible ).<br>**Online Opening of the Price bid:** Dt. 01.04.2026 at 12:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer**
**Major Stores, Panvel**



**ग्रुप ग्रामपंचायत जासई**
**मु. पो.जासई, ता. उरण, जि. रायगड**
**जाहिर निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत जासई अंतर्गत खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधितून वस्तू खरेदी कामी मान्यता प्राप्त पुरवठा दारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ. नं | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | टेंडर फॉर्मची किमंत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र. ६ मधिल जगदिश नाईक यांचे घरापासून ते प्रकाश नाईक यांच्या घराजवळील मेन गटार पर्यंत आर. सी. सी. गटार बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ अबंधित | २,९९,८३०/- | २९९८ | ५०० | ३ महिने |
| २ | वॉर्ड क्र. ३ मधिल सोमनाथ धनाजी घरत यांचे घरापासून ते माणिक रतन घरत यांचे घरापर्यंत पाईप गटार बांधणे '३ | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ अबंधित | २,२०,७६५/- | २२०७ | ५०० | ३ महिने |
| ३ | वॉर्ड क्र. २ मधिल हरी शंकर पाटील यांचे घरापासून ते रघुनाथ रामा म्हात्रे यांचे घरापर्यंत व बाबू पांडू म्हात्रे यांचे घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ अबंधित | २,९९,९८७/- | २९९९ | ५०० | ३ महिने |
| ४ | रांजणपाडा येथिल गजानन घरत यांच्या घरापासून ते शंकर मंदिर पर्यंत चेस लादी बसविणे | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ अबंधित | २,९९,९६४/- | २९९९ | ५०० | ३ महिने |

**अटी व शर्ती**
१. दरपत्रक मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक १७/०३/२०२६ ते २३/०३/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकृत तसेच GSTधारक पुरवठादार असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकरण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २४/०३/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. सदर खरेदी वस्तूंची किमत हि PFMS प्रणाली द्वारे अदा करण्यात येईल.

ठिकाण:- जासई
दिनांक :- १७/०३/२०२६

**ग्राम पंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्राम पंचायत जासई**

**सरपंच**
**ग्रुप ग्राम पंचायत जासई**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**2nd call of SRM E-TENDER NOTICE /2026-27**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works.

| Sr. No. | RFx No. | Tender no. | E-Tender No. & Description | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender | Tender Fee & EMD | Estimated Cost |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7000039050 | Ten-01/2026-2027 | 2nd call of E-tender for Hiring of Swift Dzire or equivalent Car for Executive Engineer PAC Division Panvel for the period 01.04.2026 to 31.03.2027. | Online Submission of the RFx: On or Before 27.03.2026 up to 10:59 Hrs **Technical Opening:** Dt. 27.03.2026,11:00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:** Dt. 27.03.2026,12:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |
| 2 | 7000039057 | Ten-03/2026-2027 | 2nd call of Hiring of XLYO or equivalent vehicle for Protection unit 2 under PAC Division Panvel for the period 01.04.2026 to 31.03.2027 | Online Submission of the RFx: On or Before 27.03.2026 up to 10:59 Hrs **Technical Opening:** Dt. 27.03.2026,11:00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:** Dt. 27.03.2026,12:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |
| 3 | 7000039059 | Ten-05/2026-2027 | 2nd call of Hiring of XLYO or equivalent vehicle for Communication Unit under PAC Division Panvel for the period 01.04.2026 to 31.03.2027. | Online Submission of the RFx: On or Before 27.03.2026 up to 10:59 Hrs **Technical Opening:** Dt. 27.03.2026,11:00 Hrs (Onwards if possible) **Price bid Opening:** Dt. 27.03.2026,12:00 Hrs ( Onwards if possible) | Rs. 500 + GST Applicable & EMD 1% of Estimated cost | Rs. 5,99,922/- |

**Contact Person: -**The Dy. Executive Engineer, Phone No. (022) 27457302

**Sd/-**
**Executive Engineer, PAC Division Panvel**

# नि|व|ड|क



## दूषित पाणीप्रश्नी कळंबोलीकर संतप्त

**पनवेल :** कळंबोली परिसरात गेल्या काही दिवसांपासून गढूळ व दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर के.एल.-१, सेक्टर ५-ई आणि आसपासच्या भागातील महिलांनी मनसेच्या जिल्हा सचिव स्नेहल बागल यांच्या नेतृत्वाखाली सिडको कार्यालयावर धडक मोर्चा काढून प्रशासनाचा निषेध व्यक्त केला.शनिवारपासून परिसरात कमी दाबाने तसेच दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी पिण्यासाठीही स्वच्छ पाणी उपलब्ध नसल्याची तक्रार नागरिकांनी केली. संतप्त महिलांनी गढूळ व दुर्गंधीयुक्त पाण्याच्या बाटल्या दाखवत सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी स्नेहल बागल यांनी सिडकोचे पाणीपुरवठा अभियंता प्रफ ुल देवरे यांना धारेवर धरत तात्काळ स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली. नागरिकांना पिण्यायोग्य स्वच्छ पाणी मिळाले नाही तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, संध्याकाळपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल, असे आश्वासन सिडकोचे पाणीपुरवठा अभियंता प्रफुल्ल देवरे यांनी दिले. मात्र, तसे न झाल्यास उद्या कळंबोलीतील महिलांच्या सहभागाने सिडको कार्यालयावर हंडा मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा स्नेहल बागल यांनी दिला.

## नंदकुमार तेलंगे रायगडमध्ये प्रथम, राज्यात तृतीय

**कोलाड :** रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद केंद्रशाळा कोलाड येथे कार्यरत असलेले प्रशिक्षित पदवीधर शिक्षक नंदकुमार अविनाश तेलंगे यांनी समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्यांनी रायगड जिल्ह्यात प्रथम, तर राज्यात तृतीय क्रमांक मिळवत



उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे. समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्रप्रमुख) विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा ३ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल १४ मार्च रोजी जाहीर झाला. प्राईम मिनिस्टर स्कूल फॉर रायझिंग इंडिया (पीएमश्री) राजिप केंद्रशाळा कोलाड येथील शिक्षक नंदकुमार तेलंगे यांनी या परीक्षेत २०० पैकी १६९ गुण मिळवत रायगड जिल्ह्यात प्रथम आणि राज्यात तृतीय क्रमांक पटकावला.या परीक्षेसाठी राज्यभरातून ४६,०६८ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केले होते. त्यापैकी ३८,५५८ उमेदवारांनी परीक्षा दिली होती. या स्पर्धात्मक परीक्षेत नंदकुमार तेलंगे यांनी रायगड जिल्ह्यात अव्वल स्थान मिळवले.मूळचे हेटवणे येथील असलेल्या नंदकुमार तेलंगे यांचे माध्यमिक शिक्षण कोलाड हायस्कूलमध्ये झाले आहे. सध्या ते कोलाड केंद्राचे प्रभारी केंद्रप्रमुख म्हणून कार्यरत असून, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्याने प्रयत्न करणारे शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा तसेच जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## समतानगरजवळ पाईपलाईन फुटली, लाखो लीटर पाण्याची नासाडी



• (छायाचित्र : राकेश खराडे)

**रसायनी :** उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागल्याने अनेक भागांमध्ये पाण्याची पातळी खालावत असून पाणीटंचाईची चाहूल लागली आहे. रसायनी, पाताळगंगा तसेच आसपासच्या ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाई जाणवू लागली असतानाच समतानगर, बारवई परिसरात नव्याने टाकलेली पाण्याची पाइपलाइन फुटल्याने लाखो लीटर पाणी वाया जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत दांड येथून बारवई पुलाकडे नवीन पाण्याची पाइपलाइन टाकून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. मात्र, समतानगर, बारवई येथे लोखंडी पाइपलाइन फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जात आहे. सध्या अनेक गावांना पाणीटंचाईची झळ बसत असताना अशी पाण्याची नासाडी होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. याकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. लवकरात लवकर पाइपलाइन दुरुस्त करून पाण्याची नासाडी थांबवावी, अन्यथा येत्या काळात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## खारपाडा येथील शाळेत चमत्कारामागील विज्ञान उपक्रम

**चिरनेर:** खारपाडा येथील रायगड जिल्हा परिषदेच्या सेमी इंग्रजी शाळेत, मंगळवारी (दि.१६) महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पेण शाखेच्या वतीने 'चमत्कारामागील विज्ञान' हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासोबतच अंधश्रद्धेविरुद्ध जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी समितीचे कार्यकर्ते जगदीश डंगर यांनी विविध तथाकथित चमत्कारांमागील विज्ञान, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे



समजावून सांगितले. समाजात अनेकदा चमत्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोष्टी प्रत्यक्षात विज्ञानाच्या साध्या तत्त्वांवर आधारित असतात, हे त्यांनी प्रयोगातून प्रभावीपणे स्पष्ट केले. त्यांच्या या प्रात्यक्षिकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल मोठे कुतूहल आणि उत्सुकता निर्माण झाली.कार्यक्रमात समितीच्या कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ आणि चिकित्सक विचारसरणी अंगीकारण्याचे मार्गदर्शन केले. तसेच शाळा आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीने राबविलेल्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. यावेळी मुख्याध्यापक प्रवीण यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना बुवा-बाबा, चमत्कार व अंधश्रद्धेला बळी पडू नका, असे आवाहन केले. शिक्षणाबरोबरच विवेकशील आणि वैज्ञानिक विचारसरणी विकसित करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

# नाल्यात भराव, पुराचा धोका

### || सिडको प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष || चिंचपाडा येथील नैसर्गिक नाला बुजवला



**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

नवी मुंबईच्या नियोजित विकासाचा दावा करणाऱ्या सिडको प्रशासनाच्या हद्दीत चिंताजनक प्रकार समोर आला आहे. पनवेल-उरण मार्गावरील चिंचपाडा परिसरात नैसर्गिक नाल्यात मोठ्या प्रमाणावर दगड व मातीचा भराव टाकून तो बुजवण्याचे काम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकारामुळे येत्या पावसाळ्यात चिंचपाडा व परिसरात कृत्रिम पूरस्थिती निर्माण होण्याची भीती स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

माहितीनुसार, या नाल्यालगत सिडकोमार्फत तलाव उभारण्याचे काम सुरू आहे. या कामातून निघालेली मोठ्या प्रमाणातील माती आणि दगड इतरत्र वाहून नेण्याऐवजी थेट नैसर्गिक नाल्याच्या पात्रात टाकण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. परिणामी नाल्याचा, नैसर्गिक प्रवाह मोठ्या प्रमाणात आक्रसला असून, काही ठिकाणी तो पूर्णपणे बंद होण्याच्या स्थितीत आहे.

या नाल्याद्वारे परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा होतो. मात्र नाला बुजवल्यामुळे पावसाळ्यात पाणी साचून ते थेट पनवेल-उरण या मुख्य मार्गावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक विस्कळीत होण्याबरोबरच आसपासच्या इमारतींच्या तळमजल्यात पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

नैसर्गिक जलस्त्रोतांमध्ये भराव टाकणे हा कायद्याने गुन्हा मानला जातो. तरीही हा प्रकार सिडकोच्या नजरेसमोर सुरू असून, संबंधित अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर आला असताना प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन नाल्यातील भराव हटवावा आणि नैसर्गिक पाण्याचा प्रवाह पूर्ववत करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा पहिल्याच मुसळधार पावसात चिंचपाडा परिसर जलमय झाल्यास त्याची जबाबदारी सिडको प्रशासन आणि संबंधित कंत्राटदारावरच राहील, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

"आम्ही सिडकोला कर भरतो, मग आमच्या जीवित आणि मालमत्तेला धोका निर्माण करणारी अशी कामे का केली जात आहेत?" असा संतप्त सवालही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# कायद्याच्या विद्यार्थ्यांना पोलिसांकडून धडे

### || पोलीस कार्यप्रणालीचा प्रत्यक्ष घेतला अनुभव || पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे यांचे मार्गदर्शन

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

विधी शाखेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना पोलीस प्रशासनाची कार्यपद्धती, गुन्ह्यांचे स्वरूप आणि कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी याची माहिती मिळावी या उद्देशाने माणगाव येथील नामदेव सुर्वे लॉ कॉलेजच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच माणगाव पोलीस ठाण्याला शैक्षणिक भेट दिली. यावेळी पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. या अभ्यास दौऱ्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य



डॉ. रवींद्र राठोड उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक बोराडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पोलीस ठाण्यातील दैनंदिन कामकाज, गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया आणि तपासाची पद्धत याबाबतमाहिती दिली.

गुन्हा घडल्यानंतर प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) कसा नोंदवला जातो, त्याचे कायदेशीर महत्त्व काय आहे तसेच तपासादरम्यान पुरावे गोळा करणे, पंचनामा करणे आणि दोषारोपपत्र न्यायालयात सादर होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया त्यांनी समजावून सांगितली. आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर विविध टप्प्यांची माहितीही त्यांनी दिली.

> **केवळ पुस्तकी ज्ञानापुरते न राहता विद्यार्थ्यांनी पोलीस ठाण्यातील विविध विभाग आणि कार्यप्रणाली प्रत्यक्ष पाहून समजून घेतली. पोलीस आणि वकील हे न्यायव्यवस्थेचे दोन महत्त्वाचे स्तंभ आहेत. त्यामुळे या दोन्ही घटकांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असून, भविष्यात वकील म्हणून काम करताना त्यांना या अनुभवाचा निश्चितच फायदा होईल.**
> **- प्रा. डॉ. रवींद्र राठोड**

# शेतकऱ्यांना अधिक मोबदला मिळवून देणार : खा. बारणे



**| नेरळ | प्रतिनिधी |**

बदलापूर-कर्जतरेल्वे मार्गावर नवीन मार्गिका उभारण्याच्या प्रकल्पासाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिग्रहण करण्यात येत आहे. या अधिग्रहण प्रक्रियेत बाधित शेतकऱ्यांना चालू बाजारभावापेक्षा जास्तीत जास्त मोबदला मिळावा यासाठी मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांची भेट घेऊन प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन मावळ लोकसभा मतदारसंघाचे खा. श्रीरंग बारणे यांनी दिले. कर्जत-नेरळ परिसरातील शेतकऱ्यांनी खा. बारणे यांना निवेदन देत जमीन अधिग्रहणाबाबतचा प्रश्न मांडला आहे. लवकरच मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक या भागाचा पाहणी दौरा करणार असून, त्यावेळी हा मुद्दा पुढे मांडला जाईल, असेही बारणे यांनी सांगितले.

बदलापूर-कर्जत रेल्वे मार्गावर दोन नवीन रेल्वे मार्गिका टाकण्याबरोबरच फाटक असलेल्या ठिकाणी उड्डाणपूल उभारण्याची योजना आहे. यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिग्रहण करण्याची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना बाजारभावापेक्षा जास्त मोबदला देण्यात यावा तसेच त्यांच्या कुटुंबातील

> **कर्जत परिसरातील रेल्वे फाटकांवर उड्डाणपूल उभारण्याच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. मात्र, विकासकामे करताना ज्यांच्या सुपीक जमिनी किंवा घरे जाणार आहेत, त्या शेतकऱ्यांच्या भविष्याचीही सरकारने काळजी घ्यावी, अशी आमची मागणी आहे.**
> **- महेश भगत, शेतकरी**

एका सदस्याला रेल्वे सेवेत कायमस्वरूपी नोकरी द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते महेश भगत यांनी निवेदनाद्वारे केली आहे. कर्जत ते शेलूदरम्यान असलेले रेल्वे फाटक बंद करून त्या ठिकाणी उड्डाणपूल उभारण्याच्या निर्णयाचे स्थानिकांकडून स्वागत होत आहे. मात्र, या प्रकल्पासाठी संपादित होणारी जमीन बागायती व सुपीक असल्याने अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह त्यावर अवलंबून आहे. जमीन संपादित झाल्यानंतर शेतकरी भूमीहीन होण्याची शक्यता असल्याने त्यांच्या भविष्याबाबत चिंता व्यक्त करण्यात येत आहे. यासंदर्भात महेश भगत आणि शिवाजी कराळे यांनी शेतकऱ्यांना पाचपट मोबदला देण्याची मागणी केली आहे. आंबिवली गावातील शेतकऱ्यांनी पुणे येथील कार्यालयात जाऊन खासदार बारणे यांची भेट घेऊन ही मागणी केली.

# निवृत्ती वेतनधारकांना वैद्यकीय भत्ता द्यावा

### जिल्हाध्यक्ष धुरंधर मढवी यांची सरकारकडे मागणी



**| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |**

राज्य शासनाने संवेदनशील होऊन निवृत्तांचे प्रलंबित प्रश्न सोडवावेत तसेच केंद्रीय निवृत्त कर्मचाऱ्यांप्रमाणे दरमहा १००० रुपये वैद्यकीय भत्ता द्यावा तसेच ज्येष्ठांना सेवा निवृत्तांप्रमाणे वयोपरत्वे केंद्रीय वाढीचे दराने लाभ मंजूर करावेत, अशी मागणी रायगड जिल्हा सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष धुरंधर मढवी यांनी केली.

मुरुड येथील हिंदू एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात तालुका सेवानिवृत्त संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना धुरंधर मढवी बोलत होते.

यावेळी मुरुड तालुका संघटनेचे अध्यक्ष नयन कर्णिक, उपाध्यक्ष शकील कडू, कोषाध्यक्ष गजानन पाठक, सचिव अनघा चौलकर, माजी सचिव उल्हास भगत, डॉ. मकबुल कोकाटे, हिंदू एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष दिलीप जोशी, स्टेट बँकेचे शाखाधिकारी सचीन गणवीर, कार्यकारिणी सदस्य केशव साने, उषा खोत, बाळकृष्ण कासार, रवींद्र जंजिरकर, विलास जगताप, नैनिता कर्णिक, रमेश कवळे, प्रा. मेघराज जाधव, केशव मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते.

धुरंधरमढवीपुढेम्हणालेकी,राज्य सरकारने सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मंत्रालयात स्वतंत्र कक्ष सुरू करावे. तसेच निवृत्तधारकांवर अवलंबून कुटुंबातील अविवाहित मुली, घटस्फोटित मुली तसेच दिव्यांग मुलींना कुटुंब निवृत्ती वेतनाच्या आदेशानुसार निवृत्ती वेतन सुरु करावे, अशी मागणी केली.

नयन कर्णिक यांनी संघटना निवृत्तांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. कोषाध्यक्ष गजानन पाठक यांनी अहवाल अंदाजपत्रकाचे वाचन केले. यावेळी डॉ. मकबुल कोकाटे, स्टेट बँकेचे शाखाधिकारी सचिन गणवीर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी धुरंधर मढवी व संजीवनी आरोग्य केंद्रांचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे आणि डॉ. मकबुल कोकाटे यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उषा खोत यांनी, तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष शकील कडू यांनी केले.

## टेंभुर्ली हायस्कूलमध्ये मोफत वाचनालय

**| पनवेल | प्रतिनिधी |**

अंजनी माता शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तसेच भिनार गावचे पोलीस पाटील हरेश कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून कै. विश्वनाथ तांबोळी यांच्या स्मरणार्थ कामोठ्याचा विघ्नहर्ता मंडळ वाचनालय सह्याद्री विद्यालय टेंभुर्ली येथे मोफत वाचालय सुरू करण्यात आले. ही संस्थेची सहावी शाखा आहे. १०० वाचनालय सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे. टेंभुर्ली येथील शिक्षक, पालक आणि मांजरे पोलीस



पाटील भरत चौधरी यांचा आग्रह होता की, त्यांच्याकडे वाचनालय व्हावा. त्यासाठी त्यांनी संस्थेकडे पाठपुरावा केला. म्हणून संस्थेने त्यांच्याकडे वाचनालय सुरू केले. वाचनालयाचे उद्घाटन उद्योजक सचिन तांबोळी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी सदर वाचनालयासाठी मोठी आर्थिक मदत केली. संस्थेचे प्रास्ताविक सचिव जगदीश भोईर, पोलीस पाटील साकुर्ली यांनी सादर केले. तर उपाध्यक्ष स्वागत विशे यांनी वाचनाचे महत्त्व काय आहे हे सांगितले. ग्रामविकास अधिकारी दीपिका परटोले, किरण जाधव, योगेश बांगर, दिपक देशमुख, प्रमोद पोंढेकर यांनीसुद्धा प्रबोधन केले.

# वेध मराठी नववर्षाचे...



• गुढीपाडवा अर्थात मराठी नववर्षाच्या स्वागतासाठी सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर बाजारपेठा सजू लागल्या असून मिरवणुकांसाठी ढोल-ताशा पथकांची रंगीत तालीमही सुरू झाली आहे. पनवेलमध्ये दिसणारे हे उत्साहपूर्ण दृश्य. (छायाचित्र : राजेश डांगळे)

### अर्बन स्केचर्स ग्रुपचा पुढाकार | नवी मुंबईतील बालकलाकारांसह सात चित्रकार मुरूडमध्ये दाखल

# मुरूडचे निसर्गसौंदर्य उतरले कॅनव्हासवर

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

निसर्गसंपन्न आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या मुरूड शहरातील विविध नयनरम्य स्थळांचे चित्र कॅनव्हासवर साकारण्यासाठी नवी मुंबई येथील अर्बन स्केचर्स ग्रुपमधील बालकलाकारासह सात चित्रकार मुरूडमध्ये दाखल झाले आहेत. मुरूडची संस्कृती, जुनी कौलारू घरे, लोकवस्ती आणि निसर्गरम्य परिसर यांचे थेट निरीक्षण करून



• (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

ते आपल्या कलेतून चित्ररूप देत आहेत.

या उपक्रमात मुंबई महापालिकेचे कला शिक्षक अमोल पवार, व्यावसायिक चित्रकार निशिकांत पलांडे, नवी मुंबईतील काळसेकर कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचे प्राध्यापक यतीश चव्हाण, पार्वती चव्हाण तसेच बालकलाकार गीत चव्हाण सहभागी झाले आहेत.

मुरूडच्या निसर्गसौंदर्याचे चित्रण करण्यासाठी आलेल्या या कलाकारांचे स्थानिक हौशी कलाकार जैनेंद्र सिंह आणि शशिकांत कोलवणकर यांनी स्वागत केले. यावेळी जैनेंद्र सिंह यांनी कलाकारांना मुरूडमधील विविध निसर्गरम्य आणि ऐतिहासिक स्थळांची माहिती देत कॅनव्हासवर चित्रणासाठी योग्य ठिकाणे सुचवली.

यावेळी बोलताना कला शिक्षक अमोल पवार म्हणाले की, मुरूडला निसर्गाने अतिशय सुंदर रूप दिले आहे. शहरातील कोणत्याही कोपऱ्यात उभे राहिले तरी हिरवाईने नटलेला परिसर, समुद्रकिनाऱ्याजवळील जेट्टीवरील बोटी, कोळीवाडा, नवाबी काळातील राजवाडे, नारळ-सुपारीच्या बागा, कौलारू घरे आणि स्वच्छ, विस्तीर्ण समुद्रकिनारा अशी विविध दृश्ये पाहायला मिळतात. ग्रामीण जीवन आणि निसर्गाची ही विविधता प्रत्यक्ष कॅनव्हासवर उतरवण्याची संधी येथे कलाकारांना मिळत आहे. दरम्यान, या कलाकारांचे सर्व मुरुडकरांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# यंदाच्या निवडणुका आल्या

पाच राज्यांमधील निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. तमिळनाडू, केरळ, बंगाल, पुदुच्चेरी आणि आसाम या राज्यांमध्ये २०२६ मधला पहिला निवडणूक महोत्सव होणार आहे. नऊ एप्रिलपासून त्याला सुरुवात होईल. चार मे रोजी निकाल लागतील. तमिळनाडू, केरळ वगैरेंमध्ये अपेक्षेनुसार एका टप्प्यात मतदान आहे. बंगालमध्ये मात्र केवळ दोन टप्प्यात मतदान होईल. गेल्या वेळी कायदा आणि सुव्यवस्थेचा बाऊ करून तिथे तब्बल आठ टप्प्यांमध्ये मतदान झाले होते. याचा एक अर्थ हा की, तिथली व्यवस्था आता अधिक सुधारली आहे. गेल्या वेळी पंतप्रधान व इतर नेत्यांना प्रचाराची संधी मिळावी म्हणून आठ टप्प्यांमध्ये विखरून मतदान घेण्याची जणू शिक्षाच बंगालला मिळाली होती. त्याचा भाजपला काही प्रमाणात फायदा झाला. तो दोन क्रमांकाचा पक्ष झाला. पण दुसरीकडे ममता बॅनर्जी यांना पराभूत करणे तर सोडाच त्यांच्या तृणमूल काँग्रेसच्या जागा प्रत्यक्षात वाढल्या होत्या. त्यामुळे मोदींचा ममताविरोधी प्रचार लोकांनी तेव्हा हाणून पाडला होता. किंबहुना, भाजपच्या सणसणीत श्रीमुखात लगावली होती अशीच सर्वांचीच प्रतिक्रिया होती. आता त्या अनुभवाने शहाणे होऊन भाजपने तो मार्ग न स्वीकारण्याचे ठरवलेले दिसते. अर्थात भाजपचा ममतांना हटवण्याचा प्रचार गेल्या पाच वर्षात थांबलेला नाही व गेल्या वर्षभरापासून तर मोदींचे तिथले दौरे वगैरे वाढलेच आहेत. त्यामुळे सर्वांचे लक्ष बंगालवर असेल. श्यामाप्रसाद मुखर्जींच्या बंगालमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या काळात भाजपचे सरकार आणणे हे मोदी व शाह यांचे स्वप्न असेल. पण बंगालची जनता त्यांना कितपत दाद देते ते पाहावे लागेल. दुसरीकडे दक्षिणेत केरळमध्ये डाव्या कम्युनिस्टांना हादरा देण्यासाठी भाजपवाले उतावीळ आहेत. तिथे गेली दहा वर्षे कम्युनिस्टांचे सरकार आहे. सलग दोन वेळा एकाच पक्षाचा विजय होण्याची केरळातील ही दुर्मीळ घटना होती. केरळमध्ये कोरोना काळात कम्युनिस्टांनी केलेल्या कामाची ती पावती होती. पण आता पाच वर्षांनंतर काँग्रेस तेथे सत्तेत येण्यास उत्सुक आहे. अलिकडेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये तिथे डाव्यांना मोठा दणका बसला होता. त्यामुळे कम्युनिस्टांना राज्यातील सत्ता टिकवणे हे मोठे आव्हान आहे.

### भाजपचे एकच – हिंदू विरुध्द मुस्लिम

तमिळनाडूमध्ये भाजपने कितीही प्रयत्न केले तरी किमान यावेळी त्याची डाळ शिजू शकणार नाही. ज्या अण्णा द्रमुकच्या मदतीने तमिळ प्रांतात घुसण्याचा भाजपचा प्रयत्न आहे त्या पक्षाचे तुकडे पडले आहेत. शिवाय भाजपशी सहकार्य करण्यावरून त्या पक्षात असंतोष व मतभेद आहेत. या सहकार्याचा भाजपलाच अधिक फायदा होईल अशी भीती जुन्या नेत्यांना वाटते. एकेकाळी जयललिता हयात असताना या पक्षाने सलग अनेक वर्षे राज्यात वर्चस्व गाजवले होते. पण आता त्याच्याकडे जयललितांसारखा करिश्मा असलेला नेता नाही. शिवाय भाजपसोबत गेल्यामुळे द्रवीड संस्कृती तसेच तमीळ भाषा इत्यादींना धोका निर्माण होतो असे वाटणारे अनेक लोक आहेत. त्यांना आपल्यासोबत कसे ठेवणार हा प्रश्न आहे. सत्तेत असलेल्या द्रवीड मुन्नेत्र कळघमच्या बाजूने बरे वातावरण असले तरी त्यांना निवडणूक सोपी जाईल असे नव्हे. रोजगार, महागाई, विकास, घरे, रस्ते, पाणी इत्यादींबाबत लोकांच्या अपेक्षा सतत वाढत असतात. त्यांना पुरे पडणे सोपे नसते. द्रमुकच्या काही मंत्र्यांवर झालेले भ्रष्टाचाराचे आरोप तसेच दलितांवरील अत्याचाराबाबत राज्य सरकारने न अवलंबलेले कडक धोरण असे काही मुद्दे मुख्यमंत्री स्टालीन यांना अडचणीचे ठरू शकतात. पुद्दुचेरीमध्ये भाजपला स्थानिक पक्षांच्या सोबतीने विजयाची संधी मिळू शकेल. पण ते राज्य इतके छोटे आहे की त्याचा राष्ट्रीय राजकारणावर पडणारा प्रभाव नगण्य आहे. ईशान्येतील आसाममध्ये भाजप आपली सत्ता राखतो का याकडे सर्वांचे लक्ष असेल. यासाठी गेल्या दोन-तीन वर्षांपासून मुस्लिमद्वेषाचा ठराविक कार्यक्रम चालू आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिश्व सर्मा यांनी मुसलमानांविरुध्द जितके विष ओकता येईल तेवढे ओकले आहे. मध्यंतरी दोन मुस्लिमांना बंदुकीने मारण्याचा व त्याबद्दल सर्मा यांची तारीफ करीत असल्याचा एक एआय जनरेटेड व्हिडिओ सर्वत्र व्हायरल झाला होता. भाजपनेच तो प्रसृत केला व त्यावर ओरडा होताच मागे घेतला. वास्तविक आसाममध्ये गेली पाच वर्षे सर्मा यांचे राज्य आहे. या काळात आपण केलेल्या विकासाच्या आधारे ते मते मागू शकतात. पण जमिनीवर दाखवण्यासारखे काहीच नसल्याने हिंदू विरुध्द मुस्लिम अशी फूट पाडून एकगठ्ठा हिंदू मतांच्या आधारे जिंकून येणे एवढा एकच अजेंडा त्यांच्यापुढे आहे.

### मोदींच्या कारभाराचेही ऑडिट

अर्थात, आसामच नव्हे तर सर्वच राज्यांमध्ये भाजपवाले विकासाचे कितीही नाव घेत असले तरी प्रत्यक्षात धर्मांध प्रचारावरच सर्वत्र त्यांची भिस्त आहे. तमीळ संस्कृती कशी हिंदू संस्कृतीचा भाग आहे हे दाखवण्याचे जोरदार प्रयत्न गेल्या काही महिन्यांपासून सुरू आहेत. त्यासाठी वाराणसीत तमीळ संगमचे कार्यक्रम घेण्यात आले. दुसरीकडे केरळमध्ये अचानक यंदापासून एक कुंभमेळा भरवण्यास सुरुवात झाली. त्यात अमित शाह वगैरे सर्वजण सहभागी झाले. याखेरीज केरळ स्टोरीसारखे सिनेमे काढून मल्याळम मुस्लिम समाज कसा धर्मांध आहे हे दाखवण्याचा प्रयत्न चालू आहेच. अर्थात तो गेल्या वेळी उलटला होता व यंदा तर सिनेमाही आपटला आहे. मात्र मोदींपासून सर्व नेते जाऊन केरळमध्ये हिंदू विरुध्द मुस्लिम अशी विभागणी करण्याचा जोरदार प्रयत्न करतील यात शंका नाही. बंगालमध्ये तर निवडणूक याद्यांची फेरतपासणी त्यासाठीच हाती घेण्यात आली होती. बांगलादेशातून आलेले घुसखोर मुस्लिम या यादीमध्ये मोठ्या प्रमाणात मतदार आहेत असा प्रचार भाजपने चालवला होता. त्यातून लाखो मतदारांची नावे आतापर्यंत यादीतून काढण्यात आली. या मुद्द्यावरून ममता यांनी भाजपला चांगली टक्कर दिली. त्या सातत्याने सर्वोच्च न्यायालयात गेल्या व एकदा तर त्यांनी स्वतः वकील म्हणून मतदारांची बाजू मांडली. याचा राजकीय फायदा त्यांना नक्कीच मिळेल. न्यायालयालाही अखेर यात हस्तक्षेप करून निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेवर देखरेखीसाठी न्यायाधीशांची नेमणूक करावी लागली होती. वास्तविक बांगलादेशातून बेकायदा नागरिक येत असतील तर ती जबाबदारी गृहमंत्री अमित शाह यांची आहे. पण त्याविषयी न बोलता सर्व दोष ममता बॅनर्जी यांच्यावर ढकलण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. दुर्दैवाने एकेकाळी सलग सात वेळा सत्ता भोगणारे डावे या बंगालमध्ये पुरते नेस्तनाबूत झाले आहेत. काँग्रेसची स्थितीही खराब आहे. त्यामुळे भाजप विरुध्द ममता असा हा थेट मुकाबला होणार आहे. ममता यांनी महिला, हिंदू-मुस्लिम पुजारी इत्यादींचे मानधन वाढवण्याचा केलेला फैसला त्यांच्या उपयोगी पडतो का हे मतदानामध्ये दिसेल. भाजपने तरी मध्य प्रदेश, बिहार, महाराष्ट्र इत्यादी राज्यांमध्ये याच जिवावर यश मिळवले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांनंतर आता दोन वर्षांचा कालावधी लोटला आहे. या राज्यांमधल्या मतदानामधून मोदींच्या कारभाराबाबत जनतेचे काय म्हणणे आहे तेही थोडेफार कळू शकेल.

विचार

# वाहननिर्मिती बहरणार, सोने-चांदी वधारणार

***अमेरिका-इराण युद्धाचे परिणाम लवकरच सामान्य माणसालाही जाणवू लागतील. इराणवरील हल्ल्याने देशातील सोने-चांदीच्या दरांमध्ये वाढ होण्याचे संकेत मिळत आहेत. दुसरीकडे, भारताची वाहननिर्मितीचे हब बनण्याकडे वेगाने वाटचाल सुरू आहे. आपल्या दृष्टीने आणखी महत्त्वाची बातमी म्हणजे भारत आणि युरोपीय महासंघ एकमेकांना 'मोस्ट फेव्हर्ड नेशन'चा दर्जा देत आहेत.***



**महेश देशपांडे**

सध्या जगभर युद्धाचे वारे वाहत आहेत. कोणत्याही युद्धाचा सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होतो तसाच इराण-अमेरिका युद्धाचाही होताना दिसत आहे. इराणवरील हल्ल्याने देशातील सोने-चांदीच्या दरांमध्ये वाढ होण्याचे संकेत मिळत आहेत. दुसरीकडे, वाहननिर्मितीचे हब बनण्याकडे भारताची वेगाने वाटचाल सुरू आहे. आपल्या दृष्टीने आणखी महत्त्वाची बातमी म्हणजे भारत आणि युरोपीय महासंघ एकमेकांना 'मोस्ट फेव्हर्ड नेशन'चा दर्जा देत आहेत. या बातम्यांचा सखोल आढावा घेऊ या.

अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर तसेच इस्रायलनेही मध्य पूर्वेतील या देशावर क्षेपणास्त्रांचा मारा केल्यामुळे भू-राजकीय तणाव पुन्हा एकदा तीव्र झाला आहे. प्रत्युत्तरादाखल इराणनेही हल्ला चढवला आहे. या वाढत्या तणावाचा परिणाम जागतिक बाजारावर होण्याची शक्यता असून येत्या काही दिवसांमध्ये सोने आणि चांदीच्या किमतीत वाढ होऊ शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. 'केडिया ॲडव्हायजरी'चे संचालक अजेय केडिया यांच्या मते अमेरिका-इराण तणावामुळे मार्चच्या सुरुवातीच्या व्यवहारांमध्ये सोन्याच्या किमती सध्याच्या पातळीपेक्षा सुमारे १५ टक्क्यांपर्यंत वाढू शकतात. सोन्यासाठी हा एक नवा ट्रिगर ठरू शकतो आणि दर १.८५ लाख रुपयांच्या पातळीपर्यंत जाऊ शकतात. म्हणजेच सोने सध्यापेक्षा सुमारे २३ हजार रुपयांनी महाग होऊ शकते. कमोडिटी तज्ज्ञ अनुज गुप्ता यांच्या मते, अलिकडच्या काळात सोन्याच्या दरात १० टक्क्यांपर्यंत वाढ दिसू शकते. अशा परिस्थितीत दर १.७५ लाख रुपयांच्या पुढे जाऊ शकतात. केडिया यांच्या मते, चांदीच्या दरातही मोठी वाढ होऊ शकते. त्यांनी चांदीचे दर ३.२० लाख रुपयांपर्यंत जाऊ शकतात, असा अंदाज वर्तवला आहे तर गुप्ता यांच्या अंदाजानुसार चांदीचे दर २.९० ते तीन लाख रुपयांपर्यंत जाऊ शकतात. ते सध्याच्या पातळीपेक्षा २० ते ४० हजार रुपयांनी जास्त आहेत. यापूर्वी चांदीने ४.२० लाख रुपयांचा उच्चांक गाठल्याचे सांगितले जाते. एकंदरीत, मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे सुरक्षित गुंतवणुकीकडे कल वाढत असून, त्याचा थेट परिणाम सोने-चांदीच्या दरांवर दिसून येत आहे. युध्दसंघर्ष दीर्घकाळ चालला तर किमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, वाहननिर्मिती क्षेत्रातून एक महत्त्वाची बातमी आली आहे. जगातील दोन मोठ्या वाहननिर्मिती कंपन्या जागतिक भू-राजकीय अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारतात मोठी गुंतवणूक करण्याची तयारीत आहेत. जपानी वाहननिर्मिती कंपनी 'सुझुकी मोटर कॉर्पोरेशन'ने चालू आर्थिक वर्षासाठी उत्पादनाचे लक्ष्य वाढवून ३.५२ दशलक्ष युनिट्स केले आहे. सप्टेंबरमध्ये जीएसटी दरात बदल झाल्यानंतर भारतात विक्री वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. भारत ही सुझुकीसाठी सर्वात मोठी बाजारपेठ आहे. येत्या तिमाहीमध्ये अंदाजे ६७ हजार युनिट्सचे अतिरिक्त उत्पादन करण्याचा कंपनीचा मानस आहे. त्यापैकी सुमारे ९२.५ टक्के वाढ आशियामध्ये होणार आहे. भारतातील सुझुकीची उपकंपनी असलेली मारुती सुझुकी चार कारखाने चालवते. त्यांची एकत्रित वार्षिक क्षमता २.६ दशलक्ष युनिट्स आहे. भारतात सुझुकीच्या जागतिक विक्रीचा ५६ टक्के आणि उत्पादनाचा जवळपास ६५ टक्के वाटा आहे. मारुती सुझुकीचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी (मार्केटिंग आणि सेल्स) पार्थ बॅनर्जी यांनी सांगितले, जीएसटी कपातीनंतर कंपनीच्या सर्व मॉडेल्सच्या विक्रीत वाढ झाली आहे. वाढत्या मागणीमुळे उत्पादन टीम ओव्हरटाइम काम करत असून, जानेवारीमध्ये दोन रविवारी आणि वसंत पंचमीच्या सुटीच्या दिवशीही कारखाने सुरू ठेवण्यात आले. पहिल्या नऊ महिन्यांमध्ये भारतात सुझुकीची विक्री ३.८ टक्क्यांनी वाढून १.३५ दशलक्ष युनिट्सवर पोहोचली तर युरोपमध्ये १८ टक्के घट होऊन १.३५ लाख युनिट्सवर आली.

दक्षिण कोरियाच्या ह्युंदाई मोटर कंपनीच्या अंदाजानुसार २०२६ मध्ये भारतीय उपखंडात त्यांची विक्रीतील वाढ जगात सर्वाधिक वेगाने होईल. कंपनीच्या अपेक्षेनुसार जागतिक विक्री या वर्षी ०.५ टक्के वाढून ४.१६ दशलक्ष युनिट्स होईल तर भारतात ३.१ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. ह्युंदाईसाठी अमेरिका आणि युरोपनंतर भारत परदेशातील तिसरी सर्वात मोठी बाजारपेठ असून, आंतरराष्ट्रीय विक्रीमध्ये भारताचा सुमारे १४ टक्के वाटा आहे. जानेवारीमध्ये 'ह्युंदाई मोटार इंडिया' ने विक्रीचा विक्रम नोंदवला. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक तरुण गर्ग यांनी सांगितले की शहरी आणि ग्रामीण भागातील मजबूत मागणीमुळे कंपनी सकारात्मक गती अनुभवत आहे. रिझर्व्ह बँकेने व्याजदर कमी केल्याने वाहन कर्जे स्वस्त झाली असून प्राप्तिकर सवलतींमुळेही मागणीत वाढ झाली आहे. 'रेनॉ'ने भारतातील भागीदार निस्सानकडील ५१ टक्के हिस्सा विकत घेतला असून भारत त्यांच्या जागतिक वाढीच्या धोरणातील 'मुख्य आधारस्तंभ' असल्याचे म्हटले आहे. 'रेनॉ'चे 'सीईओ' फॅब्रिक कंबोलिव्ह यांच्या मते पुढील तीन वर्षांमध्ये कंपनीच्या एकूण वाढीपैकी ५० टक्के वाढ भारत आणि ब्राझीलमधून येईल. या दशकाच्या अखेरीस भारतातील बाजारातील हिस्सा तीन ते पाच टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवून कंपनी अनेक नवीन मॉडेल्स, विशेषतः एसयूव्ही सादर करण्याच्या तयारीत आहे. भारत ही आता जगातील तिसरी सर्वात मोठी वाहन बाजारपेठ बनली आहे. येथे वाढीची मोठी क्षमता असून निर्यातीसाठीही भारत एक महत्त्वाचे उत्पादन केंद्र ठरत आहे. त्यामुळे आशियाई आणि युरोपीय वाहन कंपन्या भारतातील संधींबाबत आशावादी आहेत.

दुसरीकडे, युरोपियन युनियन आणि भारत यांच्यादरम्यान झालेल्या व्यापार करारानंतर आता या देशांनी एकमेकांना 'मोस्ट फेवर्ड नेशन' (एमएफएन) दर्जा देण्याची योजना आखली आहे. हा करार लागू झाल्यानंतर पुढील पाच वर्षे दोन्हीपैकी कोणताही पक्ष इतर व्यापार भागीदारांना अधिक चांगल्या टॅरिफ सवलती देऊ शकणार नाही. गेल्या महिन्यात भारत आणि युरोपीय महासंघाने दीर्घकाळ प्रलंबित असलेला करार केला. या कराराचा उद्देश बहुतांश वस्तूंवरील आयात शुल्क (टॅरिफ) कमी करणे आणि जागतिक व्यापार तणावाच्या पार्श्वभूमीवर द्विपक्षीय व्यापार वाढवणे हा आहे. कायदेशीर मंजुरीनंतर सुमारे एका वर्षात हा करार लागू होण्याची शक्यता आहे. करार लागू झाल्यानंतर २०३२ पर्यंत युरोपीय महासंघाला भारतातून होणारी निर्यात दुप्पट होण्याची अपेक्षा आहे. या करारामुळे सुमारे ९६.६ टक्के वस्तूंवर मूल्याच्या आधारे टॅरिफ रद्द किंवा कमी केले जातील. त्यामुळे युरोपीय महासंघ कंपन्यांना सुमारे चार अब्ज युरो (अंदाजे ४.७ अब्ज डॉलर) इतकी शुल्क बचत होण्याची शक्यता आहे. भारत आणि युरोपीय महासंघाने सोयाबीन, गोमांस, साखर, तांदूळ आणि दुग्धजन्य पदार्थ यासारख्या कृषी उत्पादनांना कराराच्या कक्षेबाहेर ठेवले आहे. मसुद्यानुसार, दोन्ही पक्ष जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांच्या पुढे जाऊन नवीन आयात-निर्यात निर्बंध न लावण्यास आणि प्रस्तावित मुक्त व्यापार कराराअंतर्गत डिजिटल व्यापार सहकार्य अधिक बळकट करण्यास सहमत झाले आहेत.

भारत आणि युरोपियन युनियनने व्यापार सुलभतेसाठी काही उपाय योजले आहेत. त्यानुसार अन्न सुरक्षा उपाय जागतिक व्यापार संघटना मानकांशी सुसंगत केले जातील, प्रमाणपत्र आणि लेखापरीक्षण (ऑडिट) प्रक्रिया सुलभ केली जाईल, सीमा शुल्क सहकार्य वाढवून मालाची जलद क्लिअरन्स प्रक्रिया सुनिश्चित केली जाईल, आयात-निर्यात किंवा ट्रान्झिटवर परिणाम करणाऱ्या सीमा शुल्क निर्णयांसाठी भेदभावरहित आणि सुलभ अपील प्रक्रिया ठेवली जाईल आणि करार लागू झाल्यानंतर एका वर्षाने दोन्ही पक्ष वार्षिक आयात आकडेवारीची देवाणघेवाण सुरू करतील; जेणेकरून कराराची अंमलबजावणी आणि टॅरिफ सवलतींचा वापर यावर लक्ष ठेवता येईल. डिजिटल व्यापाराच्या बाबतीत अनावश्यक अडथळे टाळणे आणि खुले तसेच सुरक्षित ऑनलाइन वातावरण निर्माण करण्याचे आश्वासन दोन्ही बाजूंनी देण्यात आले आहे. मसुद्यात गोपनीयतेला मूलभूत हक्क म्हणून मान्यता देण्यात आली आहे, तसेच वैयक्तिक माहिती संरक्षण आणि सीमापार डेटा हस्तांतरणावरील दोन्ही बाजूंचे अधिकार कायम ठेवण्यात आले आहेत. पेपरलेस व्यापार, इलेक्ट्रॉनिक करार, स्वाक्षऱ्या आणि प्रमाणीकरण यांना कायदेशीर मान्यता देण्यावरही भर देण्यात आला आहे. प्रस्तावित करारानुसार, हरितगृह वायू उत्सर्जनात कपात करण्यासाठी भारताच्या प्रयत्नांना युरोपीय महासंघ आर्थिक मदत आणि गुंतवणूक उपलब्ध करून देईल, असेही मसुद्यात नमूद आहे. एकंदरीत, भारत-युरोपीय महासंघ व्यापार करार हा दोन्ही अर्थव्यवस्थांसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, व्यापार, गुंतवणूक, डिजिटल सहकार्य आणि पर्यावरणीय उद्दिष्टे या सर्व क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याचा त्याचा उद्देश आहे.

चर्चा आजची

# आरोग्य यंत्रणा सलाईनवर

**प्रमोद जाधव**

ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी आरोग्य केंद्रापासून उपकेंद्रांमध्ये भरती करण्यात आली. एनआरएचएम अर्थात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य यंत्रणाअंतर्गत कंत्राटी कर्मचारी नेमले. परंतु गरज सरो आणि वैद्य मरो अशी अवस्था या कंत्राटी कर्मचाऱ्यांची झाली आहे. निधी नसल्याचे कारण सांगून त्यांना महीनो महिने मानधन दिले जात नाही. शासनाकडूनही त्याची तरतूद होत नाही. ही मोठी चिंताजनक बाब आहे. गेल्या तीन महिन्यांपासून रायगड जिल्ह्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मानधन दिले नाही. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणा सलाईवर बोलणे वावगे ठरणार आहे. याकडे आरोग्य विभागाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

एनआरएचएम अंतर्गत कंत्राटी कर्मचारी आरोग्य विभागात काम करीत आहेत. मात्र या कर्मचाऱ्यांचे दोन महिन्यांचे वेतनच दिले नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असून ते आर्थिक संकटात सापडले आहेत. हा विभाग सलाईनवर असल्याचे बोलले जात आहे. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी जिल्हा आरोग्य विभाग ही स्वतंत्र यंत्रणा आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अधिपत्याखाली जिल्हयातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवेवर देखरेख ठेवण्याचे काम केले जाते.मात्र जिल्हा आरोग्य अधिकारीच पुर्ण वेळ नसल्याची माहिती समोर येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी मोरे यांच्या बदलीनंतर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचा कारभार डॉ. मनिषा विखे यांच्याकडे सोपविण्यात आला होता. दरम्यान विखे यांची अन्य ठिकाणी बदली झाली होती. त्यामुळे त्यांनी त्या बदलीविरोधात न्यायालयात दाद मागितली. मात्र त्यांच्या जागी अन्य आरोग्य अधिकारी नेमण्यात आले होते. विखे यांच्या बाजूने न्यायालायने निकाल दिल्यावर त्या पुन्हा आरोग्य अधिकारी या पदावर आल्या. मात्र दोन- दोन आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत जिल्ह्याचा कारभार अनेक महिने चालला. यावेळी कोणाचे ऐकायचे असा प्रश्न आरोग्य कर्मचाऱ्यांकडे निर्माण झाला होता. एक खुर्ची पण दोन आरोग्य अधिकारी अशी अवस्था त्या कालावधीत घडली होती.विखे यांच्या कार्यपध्दतीविरोधात काही मंडळींनी तक्रार केल्यानंतर चौकशीनंतर त्यांचे निलंबन करण्यात आले. त्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून अतिरिक्त कारभार डॉ. प्राची नेहूलकर यांच्याकडे सोपविण्यात आला. गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा कारभार प्रभारी अधिकारी यांच्या भरोवश्यावर चालत आहे.

अजूनपर्यंत पूर्ण वेळ अधिकारी देण्यास शासन उदासीन ठरले आहे. जिल्ह्यात जिल्हा परिषद दवाखान्यांसह ५८ आरोग्य केंद्र व २८८ आरोग्य उपकेंद्र आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील आरोग्याचा कारभार सुरळीत चालविण्यासाठी तालुका स्तरावर आरोग्य अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यानंतर प्रत्येक आरोग्य केंद्रात वैद्यकिय अधिकारी व उपकेंद्रात सामुदायिक आरोग्य अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक आरोग्य व उपकेंद्रात आरोग्य कर्मचारी यांची भरती केली आहे. यातील काही आरोग्य अधिकारी व कर्मचारी कंत्राटी स्वरुपात नेमण्यात आले आहे. शासनाच्या व जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात मनुष्यबळ कमी पडत होते. शेवटच्या घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहचविताना या कर्मचाऱ्यांना अडचण निर्माण झाली.त्यामुळे शासनाने कंत्राटी कर्मचारी नेमण्याचा निर्णय घेतला. एनआरएचएम अर्थात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य यंत्रणा अंतर्गत जिल्हा रुग्णालयापासून जिल्हा परिषदेच्या आरोग्य व उपकेंद्रामध्ये वेगवेगळ्या पदावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. ७५० कंत्राटी कर्मचारी काम करीत आहेत. आरोग्य विभागाच्या वेगवेगळ्या शाखेत हे कर्मचारी काम करतात. शासनाच्या वेगवेगळ्या आरोग्य विषयक योजना जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम या कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून केले जाते. परंतु हेच कर्मचारी शासनाच्या उदासीनतेमुळे आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या कर्मचाऱ्यांचे जानेवारीपासून मानधनच दिले नसल्याची माहिती समोर आली आहे. शासनाकडून निधी न आल्याचा फटका या कर्मचाऱ्यांना बसला आहे. महिन्यातील आर्थिक खर्चाचा ताळमेळ बिघडू लागला आहे. कर्ज काढलेल्या कर्मचाऱ्यांना बँकाचा हप्ता देतानाही अडचणी निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ लागली आहे. मार्च महिना संपत आला आहे, त्यामुळे वेतनासाठी आणखी किती दिवस वाट पहावी लागणार असा सवाल कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. आरोग्य विभागाच्या या भोंगळ कारभारामुळे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सलाईनवर असल्याचे चित्र आहे. कर्मचारी विना वेतन काम करीत आहेत. वेतन मिळविण्यासाठी आदोलन केल्यास त्यांच्याविरोधात कारवाई करून त्यांना कामावर काढण्याच्या धमक्यादेखील देत असल्याची चर्चा सध्या आरोग्य विभागात सुरु आहे. आपल्या न्याय हक्कासाठी आंदोलन करणेदेखील या कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी पोषक नसल्याचे चित्र आहे.

लोकसंसद

## एसटी बसचे वाढते अपघात चिंताजनक



'प्रवाशांच्या सेवेसाठी', 'रस्ता तेथे एसटी', 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' अशी जनताभिमुख ब्रीदवाक्ये दिमाखात मिरवून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दररोज सरासरी ६० लाख प्रवाशांना सेवेचा लाभ देणाऱ्या व ग्रामीण भागाची जीवनदायिनी ठरलेल्या एसटी बसच्या अपघातात वर्षागणिक वाढ होत असल्याची चिंताजनक आकडेवारी समोर आली आहे. २०१८/१९ ते २०२३/२४ या सहा वर्षांच्या कालावधीत, २१९० दिवसांत राज्यात एसटी बसचे १५ हजार ७६७ अपघात झाले असून त्यात दोन हजार ४ प्रवाशांना प्राणास मुकावे लागले. म्हणजे एसटी बसच्या अपघातांमध्ये दररोज सरासरी एका प्रवाशाचा नाहक बळी जात आहे. एसटी महामंडळाच्या आकडेवारीनुसार अपघातांमध्ये १९ हजार ५६४ जण जखमी झाले आहेत. तसेच अपघातग्रस्तांना एसटी महामंडळाकडून ३७८ कोटी नऊ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्यात आली आहे. एकीकडे एसटीच्या प्रवासी शुल्कात वाढ होत असताना दुसरीकडे वाढत्या अपघातांमुळे एसटी प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला असून गंभीर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर, एसटी महामंडळाने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी गांभीर्याने उपाययोजना करण्याची गरज आहे. विशेषतः बसचालकांसाठी दररोज मद्यपान तपासणी बंधनकारक करणे आणि वेगमर्यादेचे नियम कडक करणे गरजेचे आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# अंतराळवीर कल्पना चावला

कल्पना चावला यांचा आज स्मृतिदिन. भारतीय अवकाश भरारीच्या स्वप्नांना 'गरुडझेप' मिळवून देणारी नायिका म्हणजे कल्पना चावला. पहिली भारतीय महिला अंतराळवीर. अवकाश संशोधनासारख्या क्षेत्रातसुद्धा भारतीय महिला कुठेही कमी नाहीत, त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून तितक्याच सक्षमतेने आणि प्रभावीपणे काम करू शकतात, हे जागतिक पातळीवर सिद्ध करून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारी अंतराळयात्री म्हणजे कल्पना चावला.

कल्पना चावला यांचा जन्म १७ मार्च १९६२ रोजी हरयाणा राज्यातील करनाल या गावी झाला. बनारसीलाल चावला आणि संज्योती चावला या दाम्पत्याचे चौथे अपत्य. भावंडांमध्ये त्या सर्वात लहान. त्यांचे शालेय शिक्षण १९७६ च्या दरम्यान टागोर स्कूलमध्ये झाले. त्यांनी पंजाब इंजिनिअरिंग कॉलेज, चंडीगढ येथून वैमानिकी अभियांत्रिकी या विषयात १९८२ साली पदवी आणि टेक्सास विद्यापीठातून अवकाश वैमानिकी अभियांत्रिकी (एरोस्पेस इंजिनिअरिंग) या विषयात १९८४ साली पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. त्यांनी १९८८ मध्ये कोलोरॅडो विद्यापीठातून अवकाश वैमानिकी अभियांत्रिकी या विषयात पीएच.डी. पदवी मिळविली.

कल्पना यांचा विवाह फ्रान्सचे वैमानिक प्रशिक्षक ज्याँ पीर हॅरीसन यांच्याशी झाला होता. त्यानंतर नासाच्या (NASA; १९९३ साली त्यांचे ओव्हरसेट मेथड्स इनकॉर्पोरेशन, लॉस अल्टोस (कॅलिफोर्निया) येथे उपाध्यक्ष आणि संशोधन वैज्ञानिक म्हणून निवड झाली. डिसेंबर १९९४ मध्ये कल्पना यांची निवड नासामध्ये अंतराळवीर म्हणून झाली. अंतराळवीरांच्या १५ व्या गटात त्यांनी स्थान मिळविले. एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर आणि परीक्षेनंतर चावला तांत्रिक बाबींवर काम करणाऱ्या स्ट्रॉनॉट ऑफिस, एव्हा (EVA, एक्स्ट्रा व्हेईक्युलरक्टिव्हिटी), रोबॉटिक्स अँड कॉम्प्युटर ब्रँच या कार्यालयात रुजू झाल्या. त्यांच्या कामात रोबॉटिक उपकरणांचा विकास आणि अंतराळ यानाला नियंत्रित करणाऱ्या सॉफ्टवेअरची शटल एव्हिऑनिक्स या प्रयोगशाळेत चाचणी घेणे समाविष्ट होते. १९९६ साली त्यांची निवड STS-८७ अवकाश यानावर मोहीम विशेषज्ञ आणि प्रमुख रोबॉटिक हस्तचालक म्हणून करण्यात आली.

कल्पना यांनी आपले पहिले अंतराळ उड्डाण STS-८७ कोलंबिया या अवकाशयानामधून १९ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर १९९७ एवढ्या कालावधीकरिता केले. ही मोहीम अवकाशात ३७६ तास आणि ३४ मिनिटे राहिली तर अवकाशयानाने पृथ्वीभोवती २५२ वेळा परिभ्रमण केले. कल्पना चावला यांचे दुसरे व अंतिम उड्डाण १६ जानेवारी ते १ फेब्रुवारी २००३ या १६ दिवसांच्या कालावधीतले. ही मोहीम विज्ञान आणि संशोधनाला समर्पित होती. विविध पाळ्यांत काम करून मोहिमेतील सदस्य दिवसातील २४ तास काम करीत होते व त्यांनी त्यात जवळजवळ ८० यशस्वी परीक्षणे केली. मात्र, या मोहिमेचा अंत दु:खद झाला. १ फेब्रुवारी २००३ ला कोलंबिया अवकाश यान परतीच्या मार्गावर असताना जमिनीवर उतरण्याच्या १६ मिनिटे आधी अवकाशयानात बिघाड झाल्यामुळे पेटले व दुर्घटनाग्रस्त झाले. त्यात कल्पना यांच्यासहित सहा अंतराळवीरांचा मृत्यू झाला. कल्पना चावला दोन्ही मोहिमांत एकूण ३० दिवस १४ तास ५४ मिनिटे अंतराळात होत्या. कल्पना चावला यांना मरणोत्तर काँग्रेशनल स्पेस मेडल ऑफ हॉनर, द नासा स्पेस फ्लाईट मेडल आणि नासा डिस्टिंगविश्ड सर्व्हिस मेडल या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. हरयाणा शासनाने त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कुरुक्षेत्र येथे कल्पना चावला स्मारक तारामंडळ उभारले आहे.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**डॉ. मानसी श्याम पाटील, वाढदिवस, खारबाव, भिवंडी**

**प्रवीण मारुती मालंडकर, वाढदिवस, अलिबाग**


# पोलादपुरात मराठी शाळांना कुलूप

## जिल्हा परिषदेच्या ३६ शाळा बंद; ग्रामीण शिक्षणावर प्रश्नचिन्ह

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

पोलादपूर तालुक्यातील अनेक मराठी शाळा अचानक बंद झाल्याने ग्रामीण शिक्षणावर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. दुर्गम भागातील रहिवाशांचे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर होत असलेले स्थलांतर तसेच अन्य कारणांमुळे पोलादपूरमधील ३६ जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडल्या आहेत. पटसंख्या वाढवण्यासाठी शिक्षण विभागाने अनेक उपाय सुचवले असले तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी न झाल्याने मराठी शाळांची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून शाळांमध्ये शिक्षकांचा तुटवडा, दुरुस्त्या न झालेल्या इमारती आणि विद्यार्थ्यांची अनुपस्थिती यामुळे ग्रामीण भागातील शाळांवर मोठा ताण पडला आहे. यामुळे पोलादपूरमधील ग्रामीण भागातील शालेय शिक्षणाला गंभीर संकट



निर्माण झाले आहे. पोलादपूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण १६४ शाळा आहेत. या शाळांमध्ये पहिले ते आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना शिकवले जाते. काही शाळांमध्ये पहिली ते पाचवीपर्यंतचे वर्ग भरतात. एकूण २४८ शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे काम करतात. मात्र या शाळांची पटसंख्या सध्या मोठ्या प्रमाणात घटत चालली आहे. दुर्गम भागात रोजगाराचे कोणतेही साधन नाही. यामुळे या भागातील कुटुंबे रोजगाराच्या शोधात स्थलांतरित झाली आहेत. त्यामुळे १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषदेच्या ३६ शाळा बंद झाल्या आहेत. यामुळे ही परिस्थिती तालुक्याच्या भविष्यासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. अशा परिस्थितीत, पोलादपूरमधील शिक्षक, विद्यार्थी आणि स्थानिक प्रशासनाने एकत्र येऊन या संकटावर उपाय शोधण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

### इंग्रजी शाळांकडे वाढता ओघ

पोलादपूर तालुक्यातील जलाचीवाडी, सावरीचीवाडी, महालगूर, आड, तामसडे, मोरेवाडी, येरंडवाडी, कोकबीचीवाडी यांसह ३६ ठिकाणाच्या मराठी शाळांना टाळे लागले आहे. अवकाळी कोसळणारा पाऊस, अतिवृष्टी, अल्प मजूर, महागाई आदी कारणांमुळे स्थलांतर वाढले आहे. तर शहरी भागातील पालकही आपल्या मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळांऐवजी इंग्रजी शाळांमध्ये पाठवू लागले असल्याने जिल्हा परिषदेच्या शाळा ओस पडू लागल्या आहेत.

### ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला धक्का

राज्य सरकारने ग्रामीण भागातील शाळांच्या पुनर्बांधणीसाठी काही योजना जाहीर केल्या आहेत. मात्र, त्या योजनांचा उपयोग कधी होईल, यावर प्रश्नचिन्ह आहे. दरम्यान, पोलादपूरमधील शाळांची बंदी राज्यातील ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला गंभीर धक्का देणारी ठरू शकते. अशा परिस्थितीत, पोलादपूरमधील शिक्षक, विद्यार्थी आणि स्थानिक प्रशासनाने एकत्र येऊन या संकटावर उपाय शोधण्याची आवश्यकता अधिक महत्त्वाची ठरू शकते.

# आदिवासी महिलांसाठी आरोग्य जनजागृती

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील डाऊन नगर येथे आदिवासी महिलांसाठी आरोग्य व स्वच्छता जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था, उरण, शिवराज युवा प्रतिष्ठान आणि शीलक्ष्मी सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. या कार्यक्रमामध्ये महिलांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः मासिक पाळीदरम्यान स्वच्छता राखण्याचे महत्त्व, सॅनेटरी नॅपकिनचा योग्य वापर तसेच महिलांच्या आरोग्याची



काळजी कशी घ्यावी याबाबत सविस्तर माहिती शीलक्ष्मी सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा रजनी ताजने यांनी दिली.

कार्यक्रमावेळी उपस्थित आदिवासी महिलांना डाबर कंपनीच्या वतीने शाम्पू, ज्यूस व सॅनेटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे महिलांमध्ये आरोग्य व स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण झाली असून उपस्थित महिलांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यतेच्या अध्यक्षा संगीता सचिन ढेरे यांनी देखील महिलांना बचत गट कसे स्थापन करावे व त्यांनी बनवलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले. आई माऊली ग्राम संघाच्या अध्यक्ष अनु पाटील यांनी देखील बचत गटाची माहिती देऊन स्वतः त्या महिलांना मदत करण्याचे आश्वासन दिले.

ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम पुढेही राबविण्यात येणार असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## रस्त्यात सापडले मृत अर्भक

**मुंबई :** मीरा रोडमध्ये निर्दयी आईने पोटच्या गोळ्याला रस्त्यावर फेकून दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पेणकरपाडा येथील वर्तक गल्लीतील स्थानिकांना हे अर्भक दिसले. त्यांनी याची माहिती काशिमीरा पोलिसांना दिली. असता पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन मृत अर्भक ताब्यात घेतले. कुणीतरी अज्ञात व्यक्तीने आपल्या अपत्याचा जन्म लपवण्याच्या उद्देशाने मृत अर्भक उघड्यावर फेकून त्याची विल्हेवाट लावल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# वनसंवर्धनाच्या उपाययोजनांसाठी तंत्रज्ञानाचा वापर

### वन मंत्री गणेश नाईक यांची माहिती

**| मुंबई | प्रतिनिधी |**

वाघ व बिबट्यांचे हल्ले, वन्यप्राणीमानव संघर्ष आणि वनसंवर्धनाच्या उपाययोजनांसाठी तंत्रज्ञानाचा वापर करून विविध उपाययोजना राबविण्यात येणार असल्याची माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभा सदस्यांनी वन विभागासंदर्भातील उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना वन मंत्री गणेश नाईक बोलत होते. त्यांनी सांगितले की, राज्यात वाघ-बिबट्यांच्या हल्ल्यांवर नियंत्रण, त्यांचे संरक्षण आणि लोकांच्या सुरक्षिततेसाठी सॅटेलाईट व आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून आधुनिक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. यासाठी वन विभागाला जमीनीच्या बदल्यात मिळणारा निधी, 'एमडीएस'मधून उभारण्यात येणारे कर्ज आणि इतर स्रोतांद्वारे मिळून सुमारे १४ हजार कोटी रुपये उपलब्ध होतील.

चर्चेत वाघ-बिबट्यांचा प्रादुर्भाव, वनपट्टे, वनउद्यान उभारणी, वनजमिनीवरील अतिक्रमण, तसेच वन्यप्राणी हल्ल्यातील पीडित कुटुंबांना मदत अशा विविध विषयांवर सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावर उत्तर देताना वन मंत्री नाईक म्हणाले की, वन विभागाबाबत लोकांच्या भावना सकारात्मक होत आहेत. राज्यातील २१ टक्के क्षेत्र वनाखाली असून ते ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून लोकसहभाग वाढवून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जात आहे. राज्य सरकारने ३०० कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला असून यावर्षी १० कोटी झाडे लावण्यात आली आहेत. पुढील वर्षांत ही संख्या वाढवत नेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडेही लक्ष देणार

वन विभागातील मनुष्यबळाबाबत वन मंत्री नाईक म्हणाले की, दीर्घकाळ तात्पुरत्या स्वरूपात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडेही लक्ष दिले जाईल. उपलब्ध निधीतून वनसंवर्धन, वनाग्नि नियंत्रण, वृक्षलागवड व कर्मचारी यंत्रणा मजबूत करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# सायबर ब्लॅकमेलिंगला कंटाळून तरुणाची आत्महत्या

**| मुंबई | प्रतिनिधी |**

कल्याण पूर्व परिसरात सायबर ब्लॅकमेलिंगच्या त्रासाला कंटाळून एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. तरुणाचे अश्लील फोटो तयार करून ते व्हायरल करण्याची धमकी देत अज्ञात इसमाकडून वारंवार पैशासाठी ब्लॅकमेल केले जात होते. त्यामुळे मानसिक तणाव वाढल्याने हेमंत पांडे (४५) याने टोकाचे पाऊल उचलले. याप्रकरणी कोळसेवाडी पोलीस तपास करत आहेत.

विठ्ठलवाडी परिसरात राहणारे हेमंत पांडे यांनी दोन महिन्यांपूर्वी कैलासनगर येथील आपल्या जुन्या घरात पंख्याला ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या घटनेनंतर कोळसेवाडी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र हेमंत यांनी अचानक आत्महत्या का केली, याबाबत कुटुंबीयांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. हेमंत यांचे मोठे भाऊ राजेश पांडे यांनी यासंदर्भात कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार हेमंत यांच्या आत्महत्येमागील कारण शोधण्यासाठी कुटुंबीयांनी त्यांच्या मित्रांशी संपर्क साधला. त्यावेळी एका मित्राने हेमंत काहीतरी सायबर गुन्ह्याच्या जाळ्यात अडकले असल्याची शक्यता व्यक्त केली.

# घारापुरी बेटावर स्वच्छता अभियान

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यात अरबी समुद्रात वसलेले ऐतिहासिक घारापुरी बेट येथे पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने समुद्रकिनारा स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते. वनशक्ती, सागरशक्ती महाराष्ट्र वनविभाग कांदळवन कक्ष, दिवाले गाव ग्रामस्थ, गव्हाण कोळीवाडा ग्रामस्थ व शेवा कोळीवाडा तसेच स्थानिक मच्छीमार यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला होता.

या स्वच्छता मोहिमेत सुमारे ५० स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. मोहिमेदरम्यान बेटावरील किनाऱ्यालगत साचलेला सुमारे ३५०० ते ४००० किलोपर्यंत अविघटनशील कचरा गोळा करून योग्य पद्धतीने विल्हेवाटीसाठी पाठविण्यात आला. समुद्रातून वाहत येणाऱ्या प्लास्टिक, थर्माकोल, काचेच्या बाटल्या आणि इतर कचऱ्यामुळे बेटाचे पर्यावरण आणि सौंदर्य धोक्यात येत असल्याने या स्वच्छता मोहिमेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या उपक्रमात स्थानिक मच्छीमारदेखील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

समुद्रात साचणारा प्लास्टिक आणि घनकचरा यामुळे मच्छीमारांच्या जाळ्यात कचरा अडकतो, मासळीचे प्रमाण कमी होते. तसेच बोटींच्या हालचालींनाही अडथळा निर्माण होतो. स्वच्छता मोहिमेमुळे या समस्येबाबत जनजागृती होण्यास मदत झाली.

समुद्रातून वाहून येणारा प्लास्टिक कचरा हा किनारी परिसंस्थेसाठी मोठे आव्हान आहे. अशा स्वच्छता मोहिमांमुळे समुद्रकिनारी परिसंस्था स्वच्छ



ठेवण्यास मदत होते, असे नंदकुमार पवार यांनी सांगितले.

**शिवतीर्थ श्रीरामनगर वेल्फेअर ट्रस्टचा पुढाकार | १०-१२ हजार लीटर क्षमतेचा तलाव तयार**

# वन्यजीवांसाठी कृत्रिम पाणवठा उभारणी

**| वावोशी | प्रतिनिधी |**

खोपोली परिसरातील वन्यजीव आणि पक्षांना उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, या उद्देशाने शिवतीर्थ श्रीरामनगर वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून कृत्रिम पाणवठा (तलाव) उभारण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. वनपाल भगवान दळवी व तालुका वनाधिकारी राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

या परिसरात वन्यजीवांना पिण्यासाठी कोणताही पाणवठा



उपलब्ध नसल्याचे लक्षात आल्यानंतर ट्रस्टच्या सदस्यांनी पुढाकार घेत वन विभागाशी संपर्क साधला. त्यानंतर वन खात्याच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. ट्रस्टचे महिला, पुरुष तसेच बाल मावळ्यांनी अथक परिश्रम घेत अवघ्या दोन दिवसांत मोठ्या आकाराचा कृत्रिम तलाव तयार केला. या तलावात सुमारे १० ते १२ हजार लिटर पाणी साठवण्याची क्षमता असून त्यामुळे परिसरातील वन्यजीव, प्राणी आणि पक्षांना मोठा दिलासा मिळणार आहे. या पर्यावरणपूरक उपक्रमात परिसरातील जयेश मोरे, शैलेश फावडे आणि अंकुश फावडे यांनीही मोलाचे सहकार्य केले. या मोहिमेत ट्रस्टचे उपाध्यक्ष विशाल रामदास वाळुंज, सेक्रेटरी आशिष रामचंद्र खोपकर, खजिनदार किरण बुधा पाटील तसेच सदस्य राजेश पाटील, विशाल चव्हाण, ज्ञानेश्वर जगताप, राकेश रामचंद्र मिरवणकर आणि प्रदीप देशमुख यांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच, महिला सदस्या सुवर्णा विशाल वाळुंज, नेहा ज्ञानेश्वर जगताप आणि ज्योती राकेश मिरवणकर यांनीही उत्साहाने सहभाग नोंदवला. याशिवाय साईदीप घावटे, भावार्थ किरण पाटील, साई ज्ञानेश्वर जगताप आणि गोलू देशमुख या लहानग्या मुलांनीही या उपक्रमात मनापासून मेहनत घेतली. काही दिवसांपूर्वी याच परिसरात वनवा लागून मोठ्या प्रमाणावर वनसंपदेचे नुकसान झाले होते. अशा परिस्थितीत उन्हाळ्यात वन्यजीवांसाठी पाण्याची सोय करणे अत्यंत गरजेचे आहे, असे मत तालुका वनाधिकारी राजेंद्र पवार यांनी व्यक्त केले.

> **उन्हाळ्याच्या काळात वन्यजीवांसाठी पाण्याची उपलब्धता हा मोठा प्रश्न असतो. अशा वेळी स्थानिक सामाजिक संस्था पुढे येऊन कृत्रिम पाणवठे तयार करतात, ही अतिशय स्वागतार्ह बाब आहे. समाज आणि वन विभागाने एकत्रितपणे काम केले तर वन्यजीव संवर्धन अधिक प्रभावीपणे करता येईल.**
>
> **– राजेंद्र पवार, वन अधिकारी, खालापूर**

## मोहोपाडा रसायनीत शोभायात्रेचे आयोजन

**| रसायनी | प्रतिनिधी |**

अखिल आर्यवंत संघ-आंतरराष्ट्रीय बजरंग दल व सकल हिंदू समाज आयोजित बजरंगी मित्र मंडळ रसायनी यांच्यावतीने मोहोपाडा रसायनीत गुरुवार दि.२६ मार्च रोजी श्रीराम नवमी उत्सवानिमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने शिवनगर येथील श्री गणेश मंदिरात श्री गणेशाची आरती करुन रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्या हस्ते श्रीरामाचे पूजन करून, पालखीचा मान देऊन शोभायात्रेला सुरुवात करण्यात येणार आहे. यावेळी शोभायात्रेतील रथात श्रीराम, लक्ष्मण, सिता व श्री हनुमानाचा वेशभुषेत चित्र साकारले जाणार आहे. तसेच, रथाला सजावट करुन श्रीरामाची प्रतिमेला सजावट केली जाणार आहे. ही शोभायात्रा शिवनगर श्री गणेश मंदिरातून पुढे श्री हनुमान मंदिर, चांभार्ली येथील छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करत दांड-रसायनी रस्त्यावरुन मोहोपाडा अशी काढण्यात येणार आहे. यावेळी मोहोपाडा प्रवेशव्दाराजवळ शोभायात्रा येताच फटाक्यांची आतषबाजी करुन जल्लोषात स्वागत करण्यात येईल. या शोभायात्रेतील ढोल ताशा पथक, डिजे, चलचित्र आकर्षण ठरणार असून भगवेमय वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून येणार असल्याचे आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे कोकण प्रांत अध्यक्ष प्रसिध्दी प्रमुख राकेश खराडे आणि रायगड जिल्हा मंत्री जनार्दन मालुसरे यांनी बोलताना सांगितले. शोभायात्रा मोहोपाडा शिवाजी चौकात येताच छ. शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात येईल. यावेळी हिंदू धर्म जनजागृती व्याख्यानाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर शोभायात्रा श्री दत्त मंदिर, श्री गणेश मंदिर येथून श्री बल्लाळेश्वर मंदिर आळी आंबिवली येथे पोहोचेल.

# निवडक

## पाले येथे महाकाव्य संमेलन

**चिरनेर :** कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरणच्या वतीने पाले येथील रामचंद्र म्हात्रे फार्महाऊसवर मंगळवारी (दि.१७) १२५ व्या मधुबन कट्टा महाकाव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाचे अध्यक्षस्थान साहित्यरत्न प्रा. एल बी पाटील भूषविले. यावेळी कोमसापचे अध्यक्ष तथा निमंत्रक मच्छिंद्रनाथ म्हात्रे, मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, कार्याध्यक्षा रंजना केणी, समता ठाकूर, संजीव पाटील यांनी दिली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून, साहित्य क्षेत्रातील नमिता कीर, प्रदीप ढवळ, विजू भाटकर, संजय गुंजाळ, गणेश कोळी, उज्वला दिघे, ज्योती राजपूत, संध्या दिवकर, गोपाळ शेळके, उज्वला दिघे, अक्षता गोसावी, संजना जवाटकर आदी साहित्यिक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्वांचा विशेष सन्मानमूर्ती म्हणून सत्कार करण्यात आला. यात योगेश म्हात्रे, वसंत चिर्लेकर, सदाशिव पाटील, कीर्ती भगत, राजेंद्र पाटील, धीरेंद्र ठाकूर, चांगदेव पाटील, प्रशांत म्हात्रे, मयंक म्हात्रे, सत्यवान म्हात्रे, हितेश मढवी, प्रा. ए. डी. पाटील, अजय शिवकर, लवेंद्र मोकल, गुंजार पाटील, सचिन डाऊर, वैशाली भिडे, चंद्रकांत मुकादम, सूर्यकांत दोडेकर, नरेश मोकाशी, कृष्णा पाटील, संजय पाटील, राजेश चोगले, वरद गावंड, आर्यन मोरखडकर, संदेश राजगुरू या सर्वांचा समावेश आहे.

## राज्य आयडॉल शिक्षक राजेंद्र अंबिके

**पाली/गोमाशी :** राज्यातील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या उत्कृष्ट शिक्षकांची एक बँक तयार करण्यासाठी एससीईआरटी महाराष्ट्र व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत आयडॉल



शिक्षक शोधप्रक्रिया राबविण्यात आली. शोधप्रक्रियेत सुधागड तालुक्यातील राज्य आदर्श शिक्षक राजेंद्र अंबिके यांची निवड झाली आहे. रायगड जिल्ह्यातील प्रथम १० शिक्षकांमध्ये स्थान मिळवत त्यांनी तालुक्याच्या शैक्षणिक वैभवात मानाचा तुरा रोवला आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील उत्तम काम करणाऱ्या, नवनवीन प्रयोग राबविणाऱ्या आणि तंत्रस्नेही शिक्षकांचा शोध घेण्यासाठी ही प्रक्रिया राबविण्यात आली होती. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवणे, शाळेचा कायापालट करणे आणि नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा वापर करणे या निकषांच्या आधारे अंबिके यांची ही निवड करण्यात आली आहे. राजेंद्र अंबिके यांच्या या यशाबद्दल सुधागड तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातून त्यांचे कौतुक होत आहे. त्यांच्या या निवडीमुळे ग्रामीण भागातील शिक्षकांना प्रोत्साहन मिळणार असून, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची चळवळ अधिक विस्तारण्यास मदत होणार आहे.



## हटलेश्वर चौकात पाण्याची गळती

**सुधागड-पाली :** पाली नगरपंचायत हद्दीतील हटलेश्वर चौक परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून पाण्याची गळती सुरू असून नागरिकांना कमी दाबाचे पाणी मिळत आहे. काही भागात तर पाणी पोहोचतच नाही. यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. उन्हाळ्याची सुरुवात झाल्यामुळे पाण्याची गरज अधिक भासू लागली आहे. अशावेळी पाणी गळती होत असल्याने नागरिकांना आवश्यक प्रमाणात पाणी मिळत नाही. कमी दाबामुळे घरगुती वापरासाठी पाणी साठवणेदेखील कठीण झाले आहे. अनेक ठिकाणी पाणी भरण्यासाठी जास्त वेळ लागत असून नागरिक त्रस्त झाले आहेत. नागरिकांनी नगरपंचायतीकडे वारंवार तक्रारी नोंदवल्या आहेत. मात्र तरीदेखील प्रत्यक्ष उपाययोजना होताना दिसत नाहीत. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

## अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यावर कारवाई

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अवैध शस्त्रे बाळगणे आणि त्यांच्या वाहतुकीवर प्रतिबंध घालण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. गुहागर-शृंगारतळी मार्गावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने धडक कारवाई करत एका आरोपीला अटक केली आहे. त्याच्याकडून गावठी कट्टा आणि बंदुकीसह तब्बल १ लाख ६० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी अवैध शस्त्रांविरुद्ध कठोर कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार १४ मार्च रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक गुहागर ते शृंगारतळी मार्गावर पेट्रोलिंग करत होते. यावेळी दुचाकीवरून जाणाऱ्या एका संशयिताला अडवून त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे अवैध शस्त्रे आढळून आली. या कारवाईत पोलिसांनी आरोपीकडून सिंगल बॅटल बंदूक, गावठी कट्टा, ८ जिवंत काडतूस, एक दुचाकी जप्त केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव संजय श्रीधर फनगुसकर (वय- ३५, रा. वेलदूर, ता. गुहागर) असे आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुहागर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान, ही शस्त्रे आरोपीने कोठून आणली आणि त्याचा वापर कशासाठी केला जाणार होता, याचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## ब्राह्मण सभेच्या वतीने रक्तदान शिबीर

**खोपोली :** खोपोली ब्राह्मण सभेच्या वतीने येथील विमलताई बिवरे सभागृहात रविवारी (दि.१५) रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरामध्ये ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी केले. याप्रसंगी नियोजन सभापती प्रतीक्षा रेटरेकर, नगरसेविका अश्विनी अत्रे, ब्राह्मण सभा अध्यक्ष राजेंद्र पेठे, उपाध्यक्षा सपना पित्रे, कार्यवाह वृषाली बेलसरे, रक्तदान उपक्रमाचे प्रमुख सुनील जोशी, अपर्णा साठे, माजी अध्यक्ष नरेंद्र हर्डीकर, अनिल रानडे, कीर्ती कुलकर्णी, अनिषा बिवरे, धनंजय मराठे, भरत करमरकर, रेवती गजेंद्रगडकर, अरविंद पाटणकर, राजश्री सरदेशपांडे, अनिरुद्ध दातार, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड उपस्थित होते. खोपोलीचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे, माजी नगरसेवक नरेश जाधव, रोटरी क्लबच्या अध्यक्षा सुनीता चव्हाण,रवींद्र गजेंद्रगडकर, कृषी अधिकारी श्रीपाद भोमे, संस्कृत भारतीच्या अनघा ताम्हणकर, विश्व हिंदू परिषदेचे रुपेश मेस्त्री यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी रक्तदान केले. रा.स्व. संघ जनकल्याण समिती संचालित ठाणे येथील वामनराव ओक रक्त केंद्रातील डॉक्टर नितीन मोरे, सिद्धेश्वर कपाले, मिलिंद कुलकर्णी, क्षितिजा परब, अमृता चव्हाण, प्रसाद होळे आणि चालक रोहित यांचे यावेळी मोलाचे सहकार्य लाभले.

# ग्रामीण भागात पुन्हा पेटल्या चुली

## गॅससाठी तब्बल ४५ दिवस प्रतीक्षा; गृहिणींचा संताप उसळला

| उरण | प्रतिनिधी |

आंतरराष्ट्रीय युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठा डळमळीत झाल्याचा फटका आता थेट ग्रामीण भागातील स्वयंपाकघरांना बसू लागला आहे. घरगुती गॅस सिलिंडरची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने गावागावात पुन्हा चुली पेटू लागल्या आहेत. गॅससाठी तब्बल ४५ दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याने गृहिणींचा संयम सुटू लागला असून प्रशासनाच्या कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे.



सध्या शहरी भागात साधारण ३० दिवसांच्या आत गॅस सिलिंडर मिळत असताना, ग्रामीण भागातील ग्राहकांना मात्र ४५ दिवसांपर्यंत वेटिंग असल्याचे वास्तव समोर आले आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस पुरवठा विस्कळीत झाल्याचा परिणाम ग्रामीण भागातील वितरण व्यवस्थेवर होत असल्याचे सांगितले जात आहे.

गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात घरगुती गॅसचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला होता. त्यामुळे चुलीवर स्वयंपाक करण्याची पद्धत जवळपास संपुष्टात आली होती. मात्र आता गॅस वेळेवर मिळत नसल्याने अनेक कुटुंबांना पुन्हा चुली पेटवण्याची वेळ आली आहे. त्यातच चुलीसाठी लागणारे लाकूडही सहज उपलब्ध होत नसल्याने गृहिणींची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. सामाजिक पदाधिकारी यांनीही प्रशासनावर नाराजी व्यक्त करत सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून गॅस सिलिंडर मिळण्यास प्रचंड उशीर होत आहे.

ग्रामीण भागात ४५ दिवस वेटिंग असल्याने अनेक कुटुंबांची मोठी गैरसोय होत आहे. दरम्यान गॅस वितरक यांनी सांगितले की, सध्या गॅस पुरवठा कमी प्रमाणात होत असल्यामुळे वेटिंग वाढली आहे. पुरवठा नियमित झाल्यानंतर ग्राहकांना वेळेत गॅस देण्याचा प्रयत्न केला जाईल.

दरम्यान, उज्ज्वला योजनेतून ग्रामीण भागात गॅस जोडण्या देऊन चुली बंद झाल्याचा सरकारचा दावा असतानाच आज पुन्हा गावागावात चुली पेटू लागल्याचे चित्र दिसू लागले आहे. त्यामुळे गॅस टंचाईचा हा भडका लवकर शांत झाला नाही, तर ग्रामीण भागातील स्वयंपाकघरांमध्ये पुन्हा ‍चुलीचा काळफपरत येणार का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

> घरगुती गॅस सिलिंडर मिळण्यासाठी तब्बल ४५ दिवस वाट पाहावी लागते. गॅस नसल्यामुळे चुलीवर स्वयंपाक करावा लागतो; पण चुलीसाठी लाकूडही मिळत नाही. त्यामुळे मोठी गैरसोय होत आहे.
>
> **– राजश्री पाटील**
> **गृहिणी**

## कानपोलीत चावडी बैठकीला प्रतिसाद

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत कानपोली येथील राम मंदिर (चावडीचे ठिकाण) येथे तहसीलदार मिनल भामरे-भोसले यांची चावडी बैठक आयोजित करण्यात आली होती. नायब तहसीलदार राजश्री जोगी, मंडळ अधिकारी बापू सरगर व मंडळ तळोजेमधील सर्व ग्राम महसूल अधिकारी तसेच कानपोली गावचे सरपंच मदन मते व उपसरपंच रामचंद्र पाटील याच्या समवेत कानपोली गावचे ग्रामस्थ यांची एकत्रित बैठक घेण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व ग्रामस्थ यांचे प्रश्न ऐकून जाणून घेऊन त्यावर मार्गदर्शन केले. तसेच अभियानातील सर्व महसूल विभागाच्या सेवा जसे डिजिटल सातबारा वाटप, विविध प्रकारचे दाखले, जिवंत सातबार मोहिमेतील वारस नोंदी, निराधार लोकांशी संबधित योजनांशी संबधित लाभ, सातबारा सबंधित सुधारणा इत्यादी अशा एकूण १५ सेवाबद्दल इतंभूत माहिती त्याना दिली. चावडी बैठक ही तशी पूर्वीपासून चालत आलेली संकल्पना या निमित्ताने पुन्हा एकदा ग्रामस्थाच्या वेळेनुसार नियोजित करून नाविन्यपूर्ण म्हणून अमलात आली.



मुरूड समुद्रकिनारी रविवारी बोटिंगचा आनंद घेताना पर्यटक दिसत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# नेरळ-शिरूर-पुणे महामार्गाला हिरवा कंदील

### ४५ वर्षे लाल फितीत अडकून



| नेरळ | प्रतिनिधी |

वन जमीन आणि भीमाशंकर अभयारण्य यांच्या जमिनीमुळे गेली ४५ वर्षे लाल फितीत अडकलेल्या उरण पनवेल नेरळ शिरूर राज्यमार्गाचे नाव बदलून नव्याने या मार्गाला राज्य सरकारने हिरवा कंदील दिला आहे. रायगड ते पुणे-अहिल्यानगर रस्त्याला जोडणारा नवीन महामार्ग प्रस्तावित असून हा महामार्ग रायगड जिल्ह्यातील कर्जत-नेरळ येथून सुरु होईल आणि पुणे-अहिल्यानगर महामार्गावर शिरुर येथे जोडला जाणार आहे.

भीमाशंकर घाट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन तत्कालीन अर्थमंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते २०११ मध्ये झाले होते आणि आज एक तप लोटले तरी वन जमिनीची परवानगी मिळत नाही. कर्जत तालुक्यातील कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर तब्बल पाच ठिकाणी २५-५० मिटर एवढे अंतर केवळ वन जमीन असल्याने शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या यंत्रणा यांना रस्ता करू दिला जात नाही.

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग आणि मुंबई पुणे एक्सपेस वे यांच्यावर पडत असलेला वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी उरण पनवेल नेरळ शिरूर असा राज्य मार्ग १९८० पासून प्रस्तावित होता. त्या राज्यमार्ग रस्त्याचे भीमशंक घाटातील कामाला २०११ मध्ये सुरुवात झाली होती. तत्कालीन अर्थमंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते घाटरस्त्याच्या कामाचा शुभारंभ झाला होता. मात्र घाटरस्त्यात जात असलेल्या वन जमिनीमधून रस्ता बनविण्यास आजतागात परवानगी मिळलेली नाही. गेली अनेक वर्षे या रस्त्याचे काम वन जमिनीमुळे अडकले होते. मात्र, आता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबईचा होणारा विस्तार लक्षात घेऊन राज्य सरकार हा राज्यमार्ग बनविण्यासाठी आग्रही आहे.

रायगड ते पुणे-अहिल्यानगर रस्त्याला जोडणारा नवीन महामार्ग प्रस्तावित असून हा महामार्ग जिल्ह्यातील कर्जत-नेरळ येथून सुरु होईल आणि पुणे-अहिल्यानगर महामार्गावर शिरुरला जोडेल, ज्यामुळे राज्याच्या विविध भागातून येणाऱ्या वाहनांना सोयीस्कर मार्ग मिळेल. प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या मंजुरी आणि निधीच्या तरतुदींसाठी कार्यवाही सुरु करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

## सायंकाळी उद्यानांमध्ये वाढली वर्दळ

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

शहरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या तापमानामुळे नागरिक उकाड्याने हैराण झाले असून त्यातून थोडासा दिलासा मिळवण्यासाठी सायंकाळी उद्यानांकडे नागरिकांचा ओढा वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. पनवेल शहरातील विविध उद्यानांमध्ये संध्याकाळच्या सुमारास नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून कुटुंबासोबत निवांत वेळ घालवण्यासाठी उद्यान हा नागरिकांचा आवडता पर्याय ठरत आहे.

दिवसभर कडक उन्हामुळे घराबाहेर पडणे टाळणारे अनेक नागरिक सायंकाळी वातावरणात गारवा जाणवताच उद्यानात फेरफटका मारण्यासाठी येत आहेत. लहान मुले मैदानात खेळताना, महिलावर्ग गवतावर बसून गप्पा मारताना तर ज्येष्ठ नागरिक निवांत बसून थंड हवेत वेळ घालवताना दिसत आहेत. त्यामुळे संध्याकाळच्या वेळेत उद्यान परिसरात उत्साही आणि आनंददायी वातावरण निर्माण होत आहे.

काही नागरिक नियमित चालणे, व्यायाम आणि आरोग्याची काळजी घेण्यासाठी उद्यानात येत आहेत. तरुण वर्गही मित्रपरिवारासोबत वेळ घालवण्यासाठी उद्यानांची निवड करत असल्याने सायंकाळच्या वेळेत उद्यानांमध्ये विशेष चैतन्य दिसून येत आहे. वाढत्या उकाड्यामुळे घरातील उष्णतेपासून थोडा दिलासा मिळावा म्हणून अनेक कुटुंबे उद्यानांमध्ये वेळ घालवत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.



## जासईत महाराजस्व समाधान शिबीर

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील जासईच्या रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर शनिवारी (दि.१४) मार्च रोजी आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरास उरण तालुक्यातील आरोग्य विभाग, कृषी विभाग, भूमी अभिलेख व महसूल विभागा अंतर्गत विविध दाखले व नवीन योजना शासन निर्णय याबाबतची माहिती उपस्थित जनसमुदायास देण्यात आली. यावेळी सातबारा ८-अ वाटप, १४ फेरफार, ७/१२ दुरुस्ती, संजय गांधी योजना लाभ प्रमाणपत्र, उत्पन्न दाखले, शिधा पत्रिका वाटप, तसेच दुय्यम शिप वाटप, नाव वाढविणे आदीचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमास उरण तालुका कृषी अधिकारी ऋतुजा सुळ, निवासी नायब तहसीलदार महेश पाटील, महसूल नायब तहसीलदार रवींद्र सानप, जिल्हा आपत्ती व्यवस्थापक समन्वय अधिकारी मनोहर म्हात्रे मंडळ अधिकारी मनीष जोशी, ग्राम महसूल अधिकारी सत्यवान पाटील, निर्मला घरत, मीनल माळी, ज्येष्ठ नागरिक, आदिवासी बांधव व महिला बचत गट अध्यक्ष, दिघोडे, विंधणे, शेवा येथील सर्व महसूल सेवक उपस्थित होते.

# माणगावात बायपासचा प्रश्न सुटेना

| माणगाव | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव व इंदापूर येथील बायपास मार्गांचे काम अद्याप अपूर्ण असल्याने या मार्गावर वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत चालली आहे. शनिवार-रविवारच्या सुट्ट्या, लग्नसराई तसेच विविध सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पर्यटक, प्रवासी आणि नागरिकांची या मार्गावर मोठ्या प्रमाणात ये-जा होत असल्याने वाहतूक कोंडीचा फटका सर्वांनाच बसत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम काही ठिकाणी रखडलेले आहे, तर काही भागात पुलांच्या कामालाही विलंब होत आहे. त्यातच माणगाव व इंदापूर येथील बायपास मार्गांचे काम पूर्ण न झाल्यामुळे बाजारपेठेतूनच वाहने मार्गक्रमण करत असल्याने



येथे वाहतुकीवर मोठा ताण निर्माण होत आहे. परिणामी, स्थानिक नागरिकांसह दूरवरून येणाऱ्या प्रवाशांना वारंवार वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, रविवारी (दि.१५) मार्च दुपारी माणगावहून महाड बाजूकडे जाणाऱ्या मार्गावर सुमारे दोन किलोमीटर पर्यंत वाहनांच्या लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. वाहतूक कोंडीमुळे पर्यटक, प्रवासी व स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर खा. सुनील तटकरे यांनी नुकतेच माणगाव बायपासचे काम ३१ मे २०२६ पर्यंत पूर्ण करून हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, अशी घोषणा केली आहे. बायपास मार्ग सुरू झाल्यानंतर मुंबईकर तसेच कोकणवासीयांना दीर्घकाळ भेडसावणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येतून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्या उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी संबंधित ठेकेदाराकडून वेगाने काम सुरू असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे येत्या दोन महिन्यांत माणगाव बायपास पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुला होईल का, याकडे आता नागरिक आणि प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

### प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नदीचे नाल्यात रूपांतर | नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त

# गणपती विसर्जन घाटाची दुरवस्था

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

बोर्ली पंचतन येथील गणपती विसर्जन घाटाची अवस्था गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दयनीय बनली असून ग्रामपंचायतीच्या सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षामुळे नदीचे अक्षरशः नाल्यात रूपांतर झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. परिसरात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचरा, साचलेले घाण पाणी, दुर्गंधी आणि अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले असून यामुळे स्थानिक नागरिकांना दररोज प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

गावातील अनेक नागरिकांनी सांगितले की, गणपती विसर्जनासारख्या धार्मिक परंपरेशी जोडलेल्या घाटाची अशी अवस्था होणे हे गावासाठी लाजिरवाणे आहे. विसर्जनघाटपरिसरातपावसाळ्यानंतर तर परिस्थिती अधिकच बिकट बनते. प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या, कचऱ्याचे ढीग आणि साचलेल्या घाण पाण्यामुळे हा परिसर अक्षरशः कचऱ्याच्या डेपोमध्ये बदलल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार हा विषय अनेक वेळा ग्रामसभेत मांडण्यात आला, अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र प्रत्येक वेळी केवळ आश्वासने देण्यात आली आणि प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासनाच्या कामकाजावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

गावातील लोकांनी या कचऱ्याच्या दुर्गंधीतून चालण्याची सवयच लावून घ्यायची का? असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अनेक जण या मार्गाने रोज ये-जा करतात; मात्र परिसरात असलेल्या कचऱ्यामुळे आणि अस्वच्छतेमुळे नाक दाबूनच या रस्त्यावरून जावे लागते, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

गेली अनेक वर्षे विविध राजकीय सत्ताधाऱ्यांच्या काळात हा गणपती विसर्जन घाट कचरा आणि प्लास्टिकने भरलेला राहिला. अनेकांनी याबाबत लेखी तक्रारी केल्या, ग्रामसभेत आवाज उठवला; मात्र प्रत्यक्षात परिस्थितीत काहीही बदल झाला नाही. त्यामुळे आता स्थानिक प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गणपती विसर्जन घाट हा केवळ धार्मिक स्थळ नसून गावाच्या सांस्कृतिक ओळखीचा भाग आहे. दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने भाविक येथे येतात. मात्र घाट परिसरातील घाण आणि कचरा पाहून भाविकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान बोर्ली पंचतन मंत्री आदिती तटकरे यांच्या मतदारसंघात येत असल्याने स्थानिक नागरिकांकडून या प्रश्नाकडे विशेष लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> **आंदोलनाचा इशारा**
> गावातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनीही प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर या प्रश्नावर तातडीने कारवाई झाली नाही तर नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागू शकतो. गणपती विसर्जन घाट परिसराची तातडीने स्वच्छता करून प्लास्टिकमुक्त करणे, कचऱ्याची नियमित विल्हेवाट लावणे आणि परिसराचे सुशोभीकरण करणे या मागण्या आता जोर धरत आहेत.

## निवडक



### म्हसळा पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

**म्हसळा :** रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली राबविलेल्या मोहिमेमुळे आणि म्हसळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांच्या प्रयत्नातून चोरीस गेलेले सहा मोबाईल तांत्रिक तपासाच्या माध्यमातून शोधण्यात यश मिळाले असून पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे तालुक्यात कौतुक होत आहे. यामध्ये अप्पर पोलीस अधिकारी अभिजित शिवथरे आणि विभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांचे विशेष सहकार्य लाभले. भारत सरकारच्या CEIR या पोर्टलच्या प्रभावी वापर करून पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे, तसेच पोलीस कॉंस्टेबल गजेंद्र कांबळे यांनी तांत्रिक बाबींची पूर्तता करून नऊ महागड्या मोबाईलचा शोध लावला. या मोबाईलची किंमत १,५९,००० रुपये आहे. गजेंद्र दिनकर यांनी उएखठ पोर्टल ला ट्रेसिंग हे मोबाईल हस्तगत केले यापुढे जर कोणाचा मोबाईल हरवल्यास त्वरित म्हसळा पोलीस ठाण्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन पारखे यांनी केले.

### मुक्या जनावरांची पाण्यासाठी धाव

**उरण :** दिवसेंदिवस वाढत चाललेल्या उष्णतेचा फटका केवळ माणसांनाच नव्हे तर मुक्या जनावरांनाही बसताना दिसत आहे. वाढत्या तापमानामुळे परिसरातील पाण्याचे स्रोत आटत चालल्याने मुक्या जनावरांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी या जनावरांना अक्षरशः वणवण भटकण्याची वेळ आली आहे. अनेक ठिकाणी पाणी मिळत नसल्याने ही जनावरे ओढे, हौद किंवा पाण्याच्या जागांकडे येत असून कोणीतरी पाणी पाजेल या आशेने तिथेच थांबत असल्याचे चित्र दिसत आहे. द्रोणागिरी गडावरील हौदाजवळ अशीच हृदयस्पर्शी घटना घडली. दोन मुक्या जनावरांनी तहानेने व्याकुळ होऊन हौदाजवळ धाव घेतली. त्यांना हौदातून पाणी काढून देण्यात आल्यानंतर त्यांनी अक्षरशः गटागटा पाणी पिऊन आपली तहान भागवली. तहान भागल्यानंतर त्या मुक्या जनावरांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधानाचे हावभाव पाहून उपस्थितांनाही मन विषण्ण झाले. वाढत्या उष्णतेमुळे मुक्या प्राण्यांची होणारी ही परवड पाहता नागरिकांनी शक्य त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करून मानवतेचा हात पुढे करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



### नागोठण्यात विविध दाखले वाटप

**नागोठणे :** नागोठण्यातील शिवगणेश सभागृहात शनिवारी (दि. १४) मार्च रोजी रोहा तालुका महसूल खात्यातर्फे घेण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरात शालेय विद्यार्थी व नागरिकांना विविध प्रकारच्या दाखल्यांचे वाटप करण्यात आले. या शिबिरात वेगवेगळ्या प्रकारच्या दाखल्यांसाठी स्टॉल लावण्यात आले होते. यामध्ये महसूल विभाग विभागातर्फे प्रलंबित फेरफार निकाली काढणे, जिवंत सातबारा अंतर्गत वारस नोंदी करणे यांसह सातबारावरील नावात दुरुस्ती करून मान्यवरांच्या हस्ते जमीन मालकांना सातबारा वितरीत करण्यात आले. याशिवाय उत्पन्नाचे दाखले, नॉन क्रिमिलियर दाखले, जातीचे दाखले देण्यात आले. याप्रसंगी रोहा प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड तहसीलदार डॉ. किशोर देशमुख, राजेश थोरे, पुंडलिक मोकल, वैशाली काकडे, उज्वला अंधेरे, भूमी अभिलेख कार्यालयाचे उपअधीक्षक भूमी अभिलेख कातडे, सुमित काते, भाई टके, अरुणा हंबीर, महादेव करे, कृष्णा धामणे, अनंत वाघ, किशोर म्हात्रे, संतोष कोळी, मनोहर सुटे, प्रवीण ताडकर, निखिल मढवी, दिनेश घाग, सुवर्णा पवार, प्रवीण साळुंखे, दिलीप खंदारे, कुलकर्णी, प्रियांका भोईर, योगेश वर्दे सर्व महसूल सेवक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण

**पनवेल :** पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्याच्या हेतूने श्री युवा मित्र मंडळ कामोठेचा विघ्नहर्ता व पनवेल तहसील कार्यालय, महसूल व वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा परिषद शाळा, फणसवाडी (खारघर) येथे विविध औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच याच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर आयोजित करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये औषधी वनस्पतींबद्दल जागरूकता निर्माण करण्यात आली. तसेच महसूल विभागाच्या वतीने नागरिकांच्या विविध प्रशासकीय अडचणी व समस्यांचे निराकरण करण्यासाठी समाधान शिबिर आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास मंडळाचे अध्यक्ष सुनील चौधरी, सचिन तांबोळी, राहुल बुधे, अशोक भानुसे, ऋषी पुंडे, सागर पाटील उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी औषधी वनस्पतींचे महत्त्व सांगत पर्यावरण संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● अलिबाग मधील ऑफिस करीता खालील जागा भरणे आहे. साईट सुपरवायझर व ऑटोकॅड ड्राफ्ट्समन मो.नं. ९९७०३९१६९७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

दिनांक : १६/०३/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री. विशाल शामलाल छाब्रीया यांनी मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| जबीन फौजान मधु वगैरे | ७६ | ० | ०-३९-५० | १-१० |

च्या शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमीन मिळकत संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

दिनांक : १६/०३/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल मनाल आरीफ धनानी यांनी मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| मालकाचे नाव | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| शाहीन मोहम्मद सईद शेख | ७३ | १२ | ०-१५-०० | ०-१५ |

च्या शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींता कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमीन मिळकत संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-दहिगाव, ता.-सुधागड, जि.-रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

| मालकाचे नाव | ग.क्र./भू.क्र | एकूण क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| केतन जसवंतलाल शाह<br>नरेंद्र भालचंद्र पंडित<br>भरत जसवंतलाल शाह<br>संदेश मनोहर कुंभार | १३६/१ | ला. योग्य ०-६०-७०<br>पो.ख. ०-०३-६०<br>एकूण ०-६४-३० | ५.८८ |

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. सोनाली गंगाधरे शहासने**
'सीता-सदन'वाकण, पो.-पाटणसई,
ता.- रोहा, जि. रायगड, ४०२१०६
मो.क्र. ७७७५८९०४५५

## हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. नरेंद्र रघुनाथ भोईर, मु. पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या वारसा हक्काच्या व खुद्द मालकीच्या व ताबेकब्जा वहीवाटीची खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| झिराड, ता. अलिबाग | ९४ | १-३३-०० | १.९० |
| | ९७/१ | १-३८-८० | ५.९० |
| | १०० | ०-०४-०० | ०.०५ |
| | १०१ | ०-३०-४० | ४.५० |
| | १०७ | ०-६६-४० | ६.३५ |
| | ११२ | ०-५८-०० | १.०५ |
| | ९९ | ०-७५-४० | ८.६५ |
| | ९५ | ००-७९-३० | ७.५५ |
| | ९८ | ००-०४-५० | ०.४५ |

सदर वर वर्णनांकीत मिळकती आमचे अशिल श्री. नरेंद्र रघुनाथ भोईर, यांचे वारसा हक्काच्या तसेच मालकी व ताबेकब्जा वहीवाटीची असून सदर वर नमुद मिळकती आमच्या अशिलांचा ताबेकब्जा व वहीवाट हक्क व मालकी असताना आमच्या अशिलांचा हक्क डावलून परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे व त्याबाबतचा विक्रीचा करारनामा करणार असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतींबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये. त्यास आमचे अशिलांची सक्त कायदेशीर हरकत राहील. या उपरही सदर मिळकतींबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षिसपत्र, साठेकरार, वचनचिठ्ठी, सामंजस्य करार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत असून असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १७/०३/२०२६

सही/-
**ॲड. विक्रांत वि. पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग-रायगड
मो.नं.८३२९४६१५४०/९४०३६५१४३६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-वाडगांव, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर १०४ क्षेत्र ०-८६-७० हे. आर., पो. ख. ०-०९-६० हे. आर. एकूण क्षेत्र ०-९५-३० हे. आर., आकार १९.८१ रू. पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. प्रभाकर नारायण म्हात्रे २) श्री. सुरेश नारायण म्हात्रे ३) श्री. रमेश नारायण म्हात्रे ४) सीमा चंद्रकांत म्हात्रे ५) दिपाली दर्शन म्हात्रे ६) नम्रता नंदकुमार म्हात्रे ७) रचना मोनिष साहानी ८) स्नेहल राजेंद्र पुरव ९) रश्मी सुजित घरत १०) श्री. रोशन प्रभाकर म्हात्रे ११) जाई प्रभाकर म्हात्रे १२) श्री. सुरज सुरेश म्हात्रे १३) प्राची प्रथमेश नाईक १४) प्राजक्ता रमेश म्हात्रे यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १६/०३/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे अवसरे ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिलांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकांचे नांव | स.नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| नादिया मेहमूद धनानी | ४/२६ | ०-०६-०<br>पो.ख. ०-०१-० | ०.०५ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील बिनशेती मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील जमिन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे-भातगांव, ता- कर्जत, जि-रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे मालक १. श्री. प्रकाश कल्याणी मोघे व २.सौ. सुप्रिया संजय कडू यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

| सर्व्हे.नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ७ | १ | लिहून देणार यांच्या खाते. नं.२७७ चे क्षेत्र ०.०९.४० | ०.७२ |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्या दरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि: १७/०३/२०२६

वकील
**ॲड. भावेश रघुनाथ विरले**
पत्ता:ब्लॉक नं .१०१,१०२, १०३, पहिला मजला,
बुरहान प्लाझा, ममदापुर नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं ८८०६०२५८३१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बामणगांव ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ३५१/३/ब, क्षेत्र ०-१३-२० हे. आर., पो. ख. ०-०२-८० हे . आर. एकुण क्षेत्र ०-१६-०० हे. आर. आकार २.६४ रू. पैसे, ही जमीन मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. मेघना मनोहर मानकर रा. रूम नं. ५, शत्रुघ्न, जे. एस. एस. रोड, मंगलवाडी, मुंबई ४००००४ यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १६/०३/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,
ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बोरघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. संदेश सिताराम पाटील रा. मु. मोकलबाग, हाशिवरे, पो. हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली खुद्द मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बोरघर ता. अलिबाग जि. रायगड | ३३५ | ०-५४-५०<br>पो.ख. ०-०५-५०<br>एकुण क्षेत्र ०-६०-०० | ५.९४ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- १७/०३/२०२६

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र. ३, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे ना-गाव, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती. मनिषा श्यामसुंदर कायदे रा. ५-२२/१,रूपल अपार्टमेंट, दादासाहेब फाळके रोड, आरोमा रेस्टॉरन्ट समोर, दादर पूर्व मुंबई-४०००१४ यांच्या नांवे असलेली मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव ता. अलिबाग जि. रायगड | १२९६ | ०-४६-८०<br>पो.ख. ०-०४-१०<br>एकुण क्षेत्र ०-५०-९० | ९.०० |

वर नमुद मिळकतीपैकी श्रीमती. मनिषा श्यामसुंदर कायदे यांच्या मालकी हक्कातील व ताबेकब्जातील ०-२३-०० हे. आर, आकार रू. ४.४२ पैसे ही मिळकत

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- १७/०३/२०२६

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र. ३, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६४८२३

दिनांक: १७/०३/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे काविर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक मनोहर दामोदर कदम, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे काविर, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| काविर ता. अलिबाग | ४४ | १-२१-२०<br>पो.ख. ०-१९-२०<br>एकूण १-४०-४० | २६.२१ |

वर नमुद जमिन मिळकतीमधील श्री. मनोहर दामू कदम यांच्या नावे असलेले क्षेत्र ०-६१-७० हे. आर., पो. ख. ०-१९-२० हे. आर. एकुण क्षेत्र ०-८०-९० हे. आर., आकार ११.०० रु. पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र ०-१६-०० हे. आर. हि जमिन मिळकतीबाबत

दिनांक: १७/०३/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ,
अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे झिराडपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद वर्णनाची जमिन मिळकत, श्री. श्याम मनोहर चव्हाण यांच्या मालकीची असून, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी खाली नमूद मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या संदर्भात सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान करार स्वाक्षरीत झाला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| झिराडपाडा, ता. अलिबाग | ९५/१ | ०-४५-६०<br>०-०६-३० पो.ख.<br>०-५१-९० एकूण | १०-३७ |

सदरील वर नमूद मिळकतीमधील श्री. संतोष मनोहर चव्हाण यांच्या मालकीची ०-२०-१० (हे. आर), या शेतजमिन मिळकतीपैकी ०-०५-०० आर्स शेत जमिन मिळकत.

सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक १६/०३/२०२६.

सही/-
**(ॲड. सतिश शंकर पाटील)**
ऑफीस अे/१, हिराबाग सीएचएस, टिळक रोड,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड - ४०२ २०१.
खरेदीदाराचे वकील
मो.नं. ९८८१८५७५२९

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - पाली बु. ता.-सुधागड जि.- रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर. चौ. मी.) | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| नथुराम विठ्ठल चव्हाण | ९४/१/९४/२/९४/४/११६/२<br>प्लॉट नं. ६१ | २-९३-०० | २९.३० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत वरील मिळकतीचे खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षिस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्राद्वारे अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून, आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १३/०३/२०२६

सही/-
**ॲड. क्रांती विष्णू कदम**
लक्ष्मी नारायण कॉम्प्लेक्स,
सोनार आळी, पाली ता. सुधागड.
मोबा. ९०२८५२५७८५

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मोजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली बिनशेती भुखंड जमिन मिळकत व त्याअंतर्गत असणाऱ्या घर मिळकती, अशी संपूर्ण मिळकत श्रीमती निलीमा अविनाश चिटणीस, राहणार पुणे, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत त्या अंतर्गत असणाऱ्या घर मिळकतींसह सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर बिनशेती जमिन मिळकत व त्याअंतर्गत असणाऱ्या घर मिळकती, पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती निलीमा अविनाश चिटणीस, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची लेखी हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा नियोजित खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली, ता. अलिबाग. | १६६/१९०/१९६/१९७/१९८/१८५ | ५-४५-००<br>एकूण | ५४-५० |
| वरसोली, ता. अलिबाग | १६६/१९०/१९६/१९७/१९८/१८८ | ४-९५-००<br>एकूण | ४९-५० |

सदर बिनशेती भुखंड जमिन मिळकती व त्या अंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायत वरसोली कडील मालमत्ता क्र. १५६१ अ, क्षेत्र ५५३ चौ. फूट व मालमत्ता क्र. १५६१ ब, क्षेत्र ३२३ चौ. फूट, ह्या घर मिळकतींसह.

अलिबाग,
दिनांक १६/०३/२०२६.

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूची मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सगज रिअलटर्स एलएलपी यांचेकडून सदर मिळकत कायम स्वरूपी मालकीहक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे ब्रँडिंग व विपणन कार्य इस्प्राव्हा वेस्टा प्रायव्हेट लिमिटेड यांचे मार्फत केले जात आहे. त्या अनुषंगाने आम्ही विद्यमान मालकांचे सदर मिळकती वरील मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्ती/संस्थेस सदर मिळकत किंवा त्यातील कोणत्याही भागा संदर्भात कोणताही हक्क, मालकीहक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबितवाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणताही दावा असल्यास त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे संबंधित कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे अशील सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उपजिल्हा रायगड यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे बामणसुरे, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथील अकृषिक जमीन गट क्रमांक १,२, १५४, १५५, १५७ व १५९ या मिळकतींवरील 'ओकासो व्हाड्डो'(Ocaso Vaddo) या प्रकल्पामधील 'व्हिला क्र. डी',साधारण २११ चौ. मी. कार्पेट क्षेत्रफळ असलेला निवासी व्हिला, तसेच त्यासोबत एक (१) कार पार्किंग क्र. डी,क्षेत्रफळ १३५ चौ.फूट,लांबी २७ फूट व रुंदी ५४ फूट.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १७/०३/२०२६

झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

## जाहीर नोटीस-

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे अलिबाग, ता.अलिबाग, येथील मंगेश दामोदर म्हात्रे यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची जमीन, घर व गोडावून मिळकतीमधील त्यांचा अविभक्त हिस्सा कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवून तसा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**जमीन, घर व गोडावून मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता.अलिबाग, त्यास सिटी सर्वे नं. ५७०, क्षेत्र २०३.२ चौमी., आकार ४८.७७, व सिटी सर्वे नं. ५७०/१, क्षेत्र ६२.७ चौमी., आकार १५.०५ या जमीन मिळकती तसेच त्यावर असलेले अलिबाग न.पा. घर मालमत्ता क्र.ALB००००१०३७ (जुना मालमत्ता क्र. ७५२) क्षेत्र ३६.६२ चौ.मी., व गोडावून मालमत्ता क्र. ALB०००००१०३८ (जुना मालमत्ता क्र.७५३) क्षेत्र २८.४४ चौ.मी., सदरहू मिळकतीमध्ये असलेला विद्यमान मालकांच्या मालकीचा अविभक्त हिस्सा हा या नोटिसचा विषय आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालकांच्या अविभक्त हिश्श्याच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकानी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीं संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १७.०३.२०२६

**ॲड. राधिका फाटक**
मु.पो. अलिबाग, ता.अलिबाग- रायगड

नि. ०७/ड
अर्जदारतर्फे ॲड. मनाली सुनिल सतविडकर

## जाहीर नोटीस

**मुरुड येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे कोर्टात**

दि. चौ. अर्ज क्र. ०६/२०२६

१) श्री. चंद्रकांत गणेश आकले,
वय ७३ वर्षे, धंदा - शेती,
रा. मु. पो. चणेरा,
ता. रोहा, जि. रायगड.
२) श्रीमती सुरेखा सुर्यकांत आकले,
वय ७५ वर्षे, धंदा - गृहिणी,
३) संदीप सुर्यकांत आकले,
वय ५५ वर्षे, धंदा -शेती,
नं. १ ते ३ रा. मु. पो. चणेरा,
ता. रोहा, जि. रायगड.
४) संगीता सुर्यकांत आकले, — अर्जदार
लग्नानंतरचे नाव प्रतीक्षा प्रदीप वेदक
वय ५० वर्षे, धंदा -गृहिणी,
रा. १ ला मजला, रूम नं. १२,
८३ क्रोवेल क्रॉस लाईन नं. २,
कालबादेवी रोड, मुंबई ४००००२
५) योगिता सुर्यकांत आकले,
लग्नानंतरचे नाव योगिता संजय सोपारकर
वय ४६ वर्षे, धंदा गृहिणी,
रा. रूम नं. २, पीठा,
चीअर्स बारच्या मागे वसई रोड पश्चिम,
वसीन ठाणे, महाराष्ट्र ४०१२०२

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस कळविण्यांत येते की,

१) अर्जदार नं. १ यांची पणजी व अर्जदार क्र २ हिची पणजी सासू तसेच अर्जदार क्र. ३, ४, ५ कै. शांताबाई आत्माराम आकले हि दिनांक ०९/०२/१९३८ मौजे मजगांव, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे राहत्या घरी मयत झाले असून त्यांचे अंत्यसंस्कार हे मौजे मजगाव येथे करण्यांत आले होते.

कै. शांताबाई आत्माराम आकले, यांच्या पश्चात त्यांना अर्जदार क्र. १ ते ५ हेच कायदेशिर वारस आहेत. अर्जदाराचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत

२) अर्जदार नं. १ ते ५ यांस त्यांचे खाजगी व शासकीय कामाकरीता ते कै. शांताबाई आत्माराम आकले, हिस कायदेशिर वारस असल्याबाबतच्या वारस दाखल्याची आवश्यकता आहे.

३) के शांताबाई आत्माराम आकले, ही मयत झाली असल्यामुळे अर्जदार नं. १ ते ५ हिस तिचे कायदेशिर वारस म्हणून अर्जदार यांचे नावे वारस दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी सदर अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.

तरी याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्याने सदर हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन तीस दिवसांचे आत या मे. न्यायालयात समक्ष हजर राहुन लेखी स्वरुपात दाखल करावी. जर मुदतीत तशी कोणतीही हरकत आली नाही तर सदरचा दाखला अर्जदार यांस देण्यांत येईल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०९/०३/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी प्रसिद्ध केली.

| सही/- | सही/- |
|---|---|
| **दिवाणी न्यायालय क. स्तर**<br>**क. लिपीक** | **दिवाणी न्यायालय क. स्तर**<br>**सहाय्यक अधिक्षक** |

## निवडक

### खासदार चषकाच्या चौथ्या फेरीत पाच संघांनी दिली धडक


**ठाणे** : उजाळा मंडळ, जय बजरंग-खारेगाव, जॉयकुमार, श्री समर्थ यांनी जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी खासदार चषक कबड्डी स्पर्धेची चौथी फेरी गाठली. तर श्री विठ्ठल मंडळाने ५-५ चढायाच्या डावात विजयी होत चौथ्या फेरीत धडक दिली. प्रथम श्रेणी पुरुषांत श्री विठ्ठल मंडळाने चुरशीच्या लढतीत डॉन बॉस्को स्पोर्ट्स् चे आव्हान ५-५ चढायाच्या जादा डावात ३७-३४ असे संपवीत ऐटीत चौथी फेरी गाठली. विश्रांतीला १३-१५ असे २ गुणांनी पिछाडीवर पडलेल्या श्री विठ्ठल मंडळाने पूर्ण डावात ३०-३० अशी बरोबरी साधली. नंतर ५-५ चढायात योगेश जाधवने आपल्या चढाईत २ गडी टिपत संघाच्या विजयात मोलाची कामगिरी केली. त्याला चढाईत चिन्मय गुरव, अक्षय मकवाना यांची, तर पकडीत चेतन मलिक, अक्षय गुरव यांची उत्तम साथ लाभली. उजाळा मंडळाने पूर्वार्धातील १२-१८ अशा पिछडीवरून नव तरुण मंडळाचा प्रतिकार ४३-३१ असा मोडून काढला. मिहीर पाटील, सुमित पाटील यांच्या झंझावाती चढायांना यश भोईर, अक्षय भोईर यांची मिळालेली भक्कम बचावाची साथ त्यामुळे हे शक्य झाले. नव तरुणच्या मानिक राठोड, नितीन राठोड, चंदन चव्हाण यांच्या खेळ दुसऱ्या डावात ढेपळला. जय बजरंग, खारेगांव संघाने आर्यन पाटील, सोहम मोरे यांच्या चढाई पकडीच्या उत्कृष्ट खेळामुळे श्री समर्थ मंडळाला २६-२२ असे नमविले. श्री समर्थच्या विवेक शिंदे, राहुल पाटील यांनी शेवटच्या क्षणापर्यंत कडवी लढत दिली. जॉय कुमार स्पोर्ट्स् ने श्री मावळी मंडळाला २३-२२ असे चकवीत चौथी फेरी गाठली.समर्थने स्व. रतन पाटील संघाला ३०-२६ असे नमविले.

### अनायावर जेंडर-अफर्मिंग सर्जरी

**नवी दिल्ली** : भारताचा माजी क्रिकेटपटू आणि कोच संजय बांगर यांची मुलगी अनाया बांगड हिच्यावर जेंडर-अफर्मिंग सर्जरी यशस्वी झाली आहे.अनायाने सोशल मीडियावर सांगितले की सर्जरी यशस्वी झाली आणि सध्या ती रिकव्हरीच्या स्टेजमधून जात आहे.अनाया बऱ्याच काळापासून या सर्जरीची वाट पाहात होती आणि मार्चमध्ये थायलंडमध्ये सर्जरी करणार होती. आता तिने पोस्ट करुन तिच्यावरील लिंग बदलाच्या सर्जरीच्या यशाची माहिती दिली आहे.अनाया हिने सोशल मीडिया पोस्टवर लिहीलेय की सर्जरी यशस्वी झाली, थोडे दुखत आहे. आता हळूहळू रिकव्हरी होत आहे. हळूहळू आता पुढे जात आहे. डॉ.चेट आणि इंटरनॅशनल हॉस्पिटलच्या टीमने घेतलेल्या काळजीबद्दल आपण त्यांचे आभार मानत आहोत. एक लांबचा प्रवास होता. आणि हा दिवस या प्रवासाचा एक महत्वपूर्ण टप्पा ठरला. तुमच्या सर्वांचे प्रेम, समर्थन आणि संदेशासाठी धन्यवाद हे माझ्यासाठी खूप महत्वाचे आहे.अनाया हिने आधी सांगितले होते की हा निर्णय काही अचानक घेतलेला नाही. तिने जवळजवळ पाच वर्षे या क्षणाची वाट पाहिली होती आणि थेरपी, वैद्यकीय तपासणी आणि आत्मनिश्चयानंतर लिंग बदल शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला होता. अनायाने म्हटले होते की ती जन्मतःच ज्या लिंगाने जन्माला आली होती त्याच्याशी ती कधीही एकरुप होऊ शकली नाही. म्हणूनच, ही शस्त्रक्रिया तिच्या स्वतःच्या व्यक्तीमत्वाच्या ओळखीच्या प्रवासात एक महत्त्वाची पायरी आहे.अनायाच्या प्रवासात तिच्या कुटुंबाने दिलेली साथ महत्त्वाची राहिली आहे. तिचा धाकटा भाऊ अथर्व बांगर हा सुरुवातीपासूनच तिच्या पाठीशी ठामपणे उभा राहिला, तर कालांतराने तिच्या पालकांनीही तिला पूर्णपणे स्वीकारले. विशेष म्हणजे, या शस्त्रक्रियेचा संपूर्ण खर्च तिचे वडील संजय बांगर यांनी उचलला आहे.

### सिनर इंडियन वेल्सचा चॅम्पियन

**नवी दिल्ली** : अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे झालेल्या इंडियन वेल्स ओपनमध्ये इटलीच्या जॅनिक सिनर आणि बेलारूसच्या आर्यना सबालेंका यांनी विजेतेपद पटकावले. पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत सिनरने रशियाच्या डॅनियल मेदवेदेवला हरवून आपले पहिले इंडियन वेल्स विजेतेपद जिंकले. तर, महिला एकेरीत जागतिक



क्रमवारीत नंबर-१ असलेल्या आर्यना सबालेंकाने एलिना रायबाकिना विरुद्ध शानदार पुनरागमन करत ट्रॉफी जिंकली.या विजयासह सिनरने हार्ड कोर्टवर होणारी सर्व मोठी विजेतेपदे आपल्या नावावर केली आहेत. महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात आर्यना सबालेंकाने एलिना रायबाकिनाला ३-६, ६-३, ७-६ (८-६) असे हरवले. सबालेंका पहिला सेट हरली होती, पण तिने जबरदस्त पुनरागमन केले.तिसऱ्या सेटच्या टाय-ब्रेकरमध्ये सामना इतका अडकला होता की रायबाकिनाकडे चॅम्पियनशिप पॉइंट होता, पण सबालेंकाने तो वाचवला आणि विजय मिळवला. हे सबालेंकाचे पहिले इंडियन वेल्स विजेतेपद आहे. यापूर्वी ती या स्पर्धेच्या अंतिम फेरीत दोनदा हरली होती.२०२३ च्या इंडियन वेल्स फायनलमध्ये एलेना रायबाकिनानेच सबालेंकाला हरवून विजेतेपद पटकावले होते. यावेळी सबालेंकाने त्या पराभवाचा बदला घेतला.

### मुंबई इंडियन्सचे शिबीर सुरू

**नवी दिल्ली** : पाच वेळाची चॅम्पियन मुंबई इंडियन्सने सोमवारपासून आयपीएल २०२६ साठी आपले प्रशिक्षण सुरू केले आहे. मुंबईत आयोजित या प्री-सीझन कॅम्पच्या पहिल्या दिवशी खेळाडूंनी फिटनेस आणि कंडिशनिंगवर लक्ष केंद्रित केले. मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने यांच्या देखरेखीखाली खेळाडूंनी मैदानावर घाम गाळला. या कॅम्पमध्ये गोलंदाजी प्रशिक्षक लसिथ मलिंगा आणि पारस म्हाम्ब्रे देखील उपस्थित होते.पहिल्या प्रशिक्षण सत्रात शार्दुल ठाकूर, मयंक मार्कंडे, अल्लाह गजनफर, नमन धीर, राजा अंगद बावा, रॉबिन मिन्झ, रघु शर्मा, मयंक रावत, दानिश मलेवार, मोहम्मद इजहार आणि अश्विनी कुमार यांचा समावेश होता. सत्राची सुरुवात फिटनेस आणि कंडिशनिंग ड्रिलने झाली. खेळाडूंनी मूव्हमेंट ड्रिल, एजिलिटी एक्सरसाइज आणि फिटनेस टेस्टमध्ये भाग घेतला. प्रशिक्षण सत्रात गोलंदाजी प्रशिक्षक पारस म्हाम्ब्रे आणि लसिथ मलिंगा, क्षेत्ररक्षण प्रशिक्षक कार्ल हॉपकिन्सन यांच्यासोबत स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग आणि फिजिओ टीम देखील उपस्थित होती.मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने म्हणाले की, प्री-सीझनचा पहिला दिवस नेहमीच खास असतो. खेळाडू मैदानावर येतात तेव्हा संघात नवीन ऊर्जा दिसते आणि येथूनच संपूर्ण मोहिमेची दिशा ठरते. ते म्हणाले की, संघात असे खेळाडू आहेत जे फ्रँचायझीला चांगले ओळखतात, तर काही नवीन चेहरेही सामील झाले आहेत. जयवर्धने यांच्या मते, पहिला दिवस संपूर्ण हंगामाच्या तयारीचा सूर सेट करतो. संघाने पहिल्या सत्रापासूनच प्रशिक्षण आणि तयारीमध्ये पूर्ण लक्ष केंद्रित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

# निवडणुकांमुळे आयपीएलच्या वेळापत्रकात बदल?

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेतील अंतिम सामना ८ मार्च रोजी पार पडला. न्यूझीलंडला अंतिम सामन्यात पराभूत करत टीम इंडिया वर्ल्ड चॅम्पियन ठरली. टीम इंडियाची टी २० वर्ल्ड कप जिंकण्याची सलग दुसरी आणि एकूण तिसरी वेळ ठरली. त्यानंतर आता क्रिकेट चाहत्यांना आयपीएलच्या १९ व्या मोसमाचे वेध लागले आहेत.

बीसीसीआयकडून ११ मार्च रोजी आयपीएलच्या १९ व्या मोसमातील पहिल्या टप्प्याचं वेळापत्रक जाहीर करण्यात आलं. एकूण ५ राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमुळे बीसीसीआयने फक्त पहिल्या टप्प्यात २० सामन्यांचेच वेळापत्रक जाहीर केले.

बीसीसीआयने दिलेल्या माहितीनुसार, २८ मार्चपासून १९ व्या मोसमाचा थरार रंगणार आहे. तर पहिल्या टप्प्यात १६ दिवसांत २० सामने खेळवण्यात येणार आहे. मात्र उर्वरित सामन्यांचं वेळापत्रक केव्हा जाहीर केलं जाणार? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. यावर बीसीसीआय उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर उर्वरित वेळापत्रक जाहीर करणार असल्याचं म्हटलं होतं. आता रविवारी १५ मार्च रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाने ५ राज्यातील निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. त्यामुळे क्रिकेट चाहत्यांना १९ व्या मोसमातील उर्वरित वेळापत्रकाची प्रतीक्षा आहे. मात्र निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्याने बीसीसीआयच्या डोकेदुखीत वाढ झाली आहे.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, ९ एप्रिलला आसामध्ये मतदान होणार आहे. आसामध्ये एकूण १२६ जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. तर दुसऱ्या बाजूला १९ व्या मोसमातील पहिल्या टप्प्यात ७ एप्रिल रोजी आसामामधील गुवाहाटीत सामना नियोजित आहे.

एकूण १० शहरांमधील स्टेडियममध्ये आयपीएलच्या १९ व्या मोसमातील सामने खेळवण्यात येणार आहेत. यामध्ये आसाममधील बारसपारा क्रिकेट स्टेडियमचाही समावेश आहे. राजस्थान रॉयल्सचं हे दुसरं होम ग्राउंड आहे. या स्टेडियममध्ये पहिल्या टप्प्यातील ३ सामने नियोजित आहे. हे तिन्ही सामने संध्याकाळी होणार आहेत.

मतदान ९ एप्रिलला होणार म्हटल्यावर ७ एप्रिलपासूनच मतदानाचं वातावरण तयार होतं. मतदानाच्या काही तासांआधी प्रचाराच्या तोफा थंडावतात. तसेच निवडणुकीनंतरचा दुसरा आणि मतमोजणीचा दिवसही सुरक्षेचा दृष्टीने महत्त्वाचा आणि आव्हानात्मक असतो. त्यामुळे आता बीसीसीआयकडून १९ व्या मोसमातील ७ आणि १० एप्रिलला होणाऱ्या सामन्यांबाबत काय निर्णय घेतला जातो हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

#### ३ सामन्यांचे वेळापत्रक

पहिला सामना, ३० मार्च, राजस्थान रॉयल्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्स

दुसरा सामना, ७ एप्रिल, राजस्थान रॉयल्स विरुद्ध मुंबई इंडियन्स

तिसरा सामना, १० एप्रिल, राजस्थान रॉयल्स विरुद्ध आरसीबी

## बोकडविरा येथे कबड्डीच्या सामन्यांचा थरार

### खेळाडूंनी केली मातीतल्या खेळातली आठवण

| चिरनेर | प्रतिनिधी |



उरण तालुक्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. कबड्डी हा मर्दानी खेळ असून, येथील मातीशी निगडित आहे. अशा या कबड्डीची परंपरा आजही बोकडविरा गावात तरुणाईकडून जपली जात आहे. असे उद्‌गार आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी बोकडविडा येथे काढले.

श्री गणेश मित्र मंडळ बोकडविडा गणेशपुर आणि ग्रामस्थ मंडळाच्या संयुक्त विद्यमाने बोकडविडा येथे सरपंच कबड्डी चषकाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्‌घाटन रविवारी (दि.१५) सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते. याप्रसंगी माजी आमदार मनोहर भोईर, नगराध्यक्षा भावना घाणेकर, पंचायत समिती सदस्य दीपक भोईर, बोकडविराच्या सरपंच अपर्णा पाटील, उपसरपंच ध्रुव पाटील, जयवंत पाटील, निर्मला पाटील, मनोज पाटील, गावचे अध्यक्ष सूर्यकांत पाटील, आणि ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सरपंच कबड्डी चषकात रायगड आणि कोकणातील ३२ कबड्डी संघांनी भाग घेतला होता.

यापुढे महेंद्र घरत यांनी येथील सर्व ग्रामस्थ कबड्डीसाठी एकत्र येतात, ही निश्चितच आनंदाची बाब आहे. गावाशी प्रत्येकाचे अतूट नाते असायला हवे. कारण शेवटी गाववाल्यांच्या खांद्यावरूनच आपल्याला शेवटचा प्रवास करायचा असतो, याची जाणीव हवी. त्यामुळे गावातील प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होणे आपले कर्तव्यच असते. तेथे कधीही राजकारण आडवे येता कामा नये. गावाचा सर्वांगीण विकास हे ध्येय उराशी बाळगणारी मंडळी हवीत, तर गावाचा विकास होतो. माझ्याकडे जे जे आहे ते ते देण्याचा मी प्रयत्न करत आहे, त्यामुळे ग्रामस्थांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे. असेही त्यांनी यावेळी आपले मत मांडले.

## गणेश क्रिकेट क्लब पिंगळसई अ संघाने उमटविली कुणबी चषकावर मोहोर



| खांब | प्रतिनिधी|

रोहातालुकाकुणबीसमाजोन्नती सोनगाव ग्रुप यांच्या वतीने व शिव छत्रपती क्रिकेट असोसिएशन पिंगळसई यांच्या सहयोगाने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या कुणबी चषकाचा बहुमान गणेश क्रिकेट क्लब पिंगळसई अ संघाने पटकावून चषकावर आपली मोहोर उमटवली आहे.

स्पर्धेचे उद्‌घाटन मारूती कदम, खेळू ढमाळ, शिवाजी मुटके, धर्मा शेलार, यशवंत मोंडे, तानाजी मोरे, सुशील खांडेकर, सदानंद खेरटकर, शंकर शिंदे, मंगेश ढमाळ, सुधीर भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.तर स्पर्धेदरम्यान माजी आ.अनिकेत तटकरे, जि.प.उपाध्यक्ष मधुकर पाटील, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष विनोद पाशिलकर, पं.स.सदस्य सुरेश मगर, अनिल भगत, शंकर म्हसकर, शिवराम महाबळे, शिवराम शिंदे, विष्णू लोखंडे, महादेव साळवी, अनंत थिटे, मुकेश भोकटे, निवास खरिवले, सुहास खरिवले, सतिश भगत आदी प्रमुख मान्यवरांनी उपस्थिती नोंदवून समाजाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

या स्पर्धेतील उपविजेतेपदाचा बहुमान जय भवानी मुठवली या संघाला मिळाला आहे. तृतीय व चतुर्थ क्र.गणेश क्रिकेट क्लब पिंगळसई ब व भैरवीनाथ धामणसई या संघांनी प्राप्त केले आहेत. उत्कृष्ट गोलंदाज महेश बारस्कर, उत्कृष्ट फलंदाज विवेक मुटके, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक सौरभ ठाकूर व मालिकावीर म्हणून विवेक जाधव यांना सन्मानित केले आहे.

या स्पर्धेचे समालोचन यासिन मर्चन्ट व संजय म्हात्रे यांनी केले. संपुर्ण स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष खेळू ढमाळ, उपाध्यक्ष शिवाजी मुटके, सचिव यशवंत मोंडे, गोपाळ खरिवले, खजिनदार सुशील खांडेकर, महेश तुपकर, सल्लागार महादेव साळवी, संतोष खेरटकर, सदस्य सुनील मोहिते, विलास साळवी, धर्मा शेलार, तानाजी मोरे, सुभाष भोकरे, अशोक कडव, दत्ता सानप, प्रकाश भोसले, अनिल सानप, हेमंत मालुसरे, सुधीर भोसले, अनिल आयरे, दिनेश रटाटे, निलेश मगर, तानाजी ठमके, सतिश ठाकूर, गौरव बडे, अशोक जाधव, नितेश शेलार, निलेश मालुसरे,राजेश शिर्के, कृष्णा बामुगडे आदींनी सहकार्य केले.

## न्यूझीलंडचा जबरदस्त विजय

### दक्षिण आफ्रिकेचा ८० धावांनी धुव्वा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



न्यूझीलंड वूमन्स क्रिकेट टीमने मायदेशात दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी २० मालिकेची जबरदस्त अशी सुरुवात केली आहे. न्यूझीलंडने अमेलिया केर हीच्या नेतृत्वात रविवारी १५ मार्च रोजी ५ सामन्यांच्या टी २० मालिकेत विजयी सलामी दिली आहे.

न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा ८० धावांच्या मोठ्या फरकाने धुव्वा उडवला. न्यूझीलंडने या विजयासह ५ सामन्यांच्या टी २० मालिकेत १-० अशा फरकाने आघाडी मिळवली. उभयसंघातील या सामन्याचं आयोजन हे बे ओव्हलमध्ये करण्यात आलं होतं.

मालिकेतील पहिल्याच सामन्यात न्यूझीलंडच्या बाजूने नाणेफेकीचा कौल लागला. न्यूझीलंडने ७ विकेट्स गमावून २० ओव्हर अर्थात १२० बॉलमध्ये १९० धावा केल्या. न्यूझीलंडसाठी अमेलिया केर हीने सर्वाधिक धावा केल्या. केरने ४४ बॉलमध्ये ७८ रन्स केल्या. अमेलियाने या खेळीतील ५६ धावा या चौकार आणि षटकारांच्या मदतीने पूर्ण केल्या. अमेलियाने ११ चौकार आणि २ षटकार खेचले. तर जॉर्जिया प्लिमर हीने ६३ धावांचं योगदान दिलं.

महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या स्थगितीसाठी

## आयएसडब्ल्युआय न्यायालयात

**पुणे :** राज्यात महाराष्ट्र केसरी आणि मानाच्या स्पर्धांचं आयोजन केलं जातं. मात्र गेल्या काही वर्षांत कुस्तीलाही राजकारणाचा स्पर्श झाला आहे. त्यामुळे या स्पर्धांची मजा काही प्रमाणात कमी झाल्याचं कुस्ती प्रेमींकडून म्हटलं जातं. पुण्यात होणाऱ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेवर स्थगिती आणावी. तसेच त्या संदर्भात मनाईचे आदेश देण्यात यावे, अशी मागणी इंडियन स्टाईल रेसलिंग असोसिएशन ऑफ इंडिया या संघटनेकडून करण्यात आली आहे.

## अर्जेंटिना-स्पेन यांच्यातील फायनालिसिमा सामना रद्द

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

अर्जेंटिना आणि स्पेन यांच्यातील फायनॅलिसिमा सामना रद्द करण्यात आला आहे. युरोपियन फुटबॉल संघाने सांगितले की, मध्यपूर्वेतील वाढते युद्ध आणि सुरक्षा परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

हा सामना २७ मार्च रोजी कतारची राजधानी दोहा येथे खेळवला जाणार होता. यामध्ये दक्षिण अमेरिकेची चॅम्पियन अर्जेंटिना आणि युरोपची चॅम्पियन स्पेन आमनेसामने येणार होत्या. हा सामना लिओनेल मेस्सी आणि लामिन यामल यांच्या संघांमधील एक मोठा सामना मानला जात होता.

मध्यपूर्वेत इराण आणि त्याच्या शेजारील देशांमधील संघर्ष तसेच अमेरिका-इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यांमुळे या प्रदेशातील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण बनली आहे. गेल्या तीन आठवड्यांपासून सुरू असलेल्या या तणावाच्या पार्श्वभूमीवर कतारमध्ये सामना आयोजित करणे धोकादायक मानले गेले.

## बांगलादेशचा सामन्यासह मालिका विजय

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



बांगलादेश क्रिकेट टीमने पाकिस्तान विरुद्ध रविवारी १५ मार्च रोजी तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात ११ धावांनी विजय मिळवला आहे. बांगलादेशने या विजयासह ३ सामन्यांची मालिका २-१ अशा फरकाने आपल्या नावावर केली आहे.

बांगलादेशने पाकिस्तानसमोर २९१ धावांचं आव्हान ठेवलं होतं. सलमान आघा याने शतक झळकावून पाकिस्तानला विजयी धावांजवळ आणून ठेवलं होतं. त्यामुळे सामना रंगतदार स्थितीत आला होता. मात्र सलमान आघा आउट झाल्यानंतर पाकिस्तानच्या एकाही फलंदाजांला पाकिस्तानला सुरक्षितपणे विजयापर्यंत पोहचवता आलं नाही. पाकिस्तानच्या फलंदाजांनी बांगलादेशच्या गोलंदाजांसमोर गुडघे टेकले. त्यामुळे पाकिस्तानला विजयी धावांचा पाठलाग करताना ऑलआऊट २७९ धावा करत आल्या. बांगलादेशने अशाप्रकारे सामन्यासह मालिका आपल्या नावावर केली.तांझिद हसन तमिम आणि तास्किन अहमद या दोघांनी बांगलादेशच्या विजयात प्रमुख योगदान दिलं. तर इतरांनीही आपली भूमिका चोखपणे पार पाडली. तांझिदने एकदिवसीय कारकीर्दीतील पहिलंवहिलं शतक झळकावलं. तांझिदच्या शतकामुळे बांगलादेशला २९० धावांपर्यंत पोहचता आलं. तर त्यानंतर तास्किनने सर्वाधिक ४ विकेट्स घेत पाकिस्तानला बॅकफुटवर ढकलण्याचं काम केलं.

### पाकिस्तानचा ११ धावांनी धुव्वा, सलमान आघाचं शतक व्यर्थ

#### सलमान आघाची शतकी खेळी

त्यानंतर सलमान आघा याने शतक झळकावून पाकिस्तानचा डाव सावरला. इतकंच नाही तर सलमानने पाकिस्तानला जवळपास विजयाजवळ आणून ठेवलं. मात्र आघा ४८ व्या ओव्हरमध्ये आऊट झाला. आघा आऊट झाला तेव्हा पाकिस्तानला ३० धावांची गरज होती. मात्र बांगलादेशच्या गोलंदाजांसमोर पाकिस्तानला विजयी आव्हानापर्यंत पोहचता आलं नाही.

**बीसीसीआयकडून सर्वात मोठा पुरस्कार** **क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्काराने गौरव**

# शुबमन गिल-स्मृती मंधानाचा केला सन्मान

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेतील ऐतिहासिक विजयानंतर भारतीय क्रिकेट वर्तुळात आनंदाचं वातावरण पाहायला मिळत आहे. आयसीसीच्या गेल्या काही स्पर्धेत मेन्स आणि वुमन्स टीम इंडियाने जबरदस्त कामगिरी केली आहे. अंडर १९ मेन्स आणि वुमन्स टीम इंडियाने वर्ल्ड कप जिंकला आहे. अशात आता टीम इंडियासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बीसीसीआयकडून पुरस्कार सोहळ्यात सन्मानित करण्यात आलं आहे.

बीसीसीआयकडून मेन्स वनडे आणि टेस्ट टीम इंडियाचा कॅप्टन शुबमन गिल याला सन्मानित करण्यात आलं आहे. तर महिला संघाची उपकर्णधार स्मृती मंधानाचाही सत्कार करण्यात आला आहे. शुबमनला सर्वोत्तम कामगिरीसाठी क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. तर स्मृतीला क्रिकेटर ऑफ द इयर पुरस्काराने गौरवण्यात आलं. या दोघांनाही २०२४-२०२५ या मोसमातील कामगिरीसाठी हा सन्मान देण्यात आला आहे. नवी दिल्लीतील एका हॉटेलमध्ये या भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

स्मृती मंधानाने गेल्या मोसमात १८०० धावा केल्या होत्या. शुबमन गिल याने नेतृत्वाच्या जबाबदारीसह १ हजार ५६५ धावा केल्या होत्या. या कामगिरीसाठी स्मृती आणि शुबमनला हा मोठा पुरस्कार देण्यात आला.

#### सर्व खेळाडूंना मेडल

बीसीसीआयच्या या विशेष कार्यक्रमात अंडर १९ वर्ल्ड कप विजेता मेन्स आणि वुमन्स टीम इंडियातील खेळाडू या कार्यक्रमाला उपस्थित होते. तसेच टी २० वर्ल्ड कप विजेता टीम इंडियातील खेळाडूंनीही या पुरस्कार सोहळ्याला उपस्थिती लावली. बीसीसीआयकडून या सर्व खेळाडूंना मेडलने सन्मानित करण्यात आले.

#### तिघांना जीवनगौरव पुरस्कार

तसेच बीसीसीआयकडून रॉजर बिन्नी,राहुल द्रविड आणि मिताली राज या भारताच्या ३ माजी खेळाडूंना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. क्रिकेटमधील अतुलनीय योगदानासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)